

श्री गणेशाय नम: ।। हे शंकरा अघमोचका । नीलकंठा मदनांतका । दया
करी भक्तरक्षका । विनवीत प्रेंमे दास हा ।।१।। षष्ठाध्यायापर्यंत । तव कृपे
वदलो समस्त । आवडो हे भक्ताप्रत । पुढती देई मति दीना ।।२।।
पूर्वाध्यायीचे निरुपण । सखाराम काशीसी जाऊन । जान्हवी उदकी जाण
। योग साधीत बैसले ।।३।। इकडे अहल्या सदनी । शोक करी निशिदिनी ।
म्हणे सखारामावाचुनी । मजला शून्य सर्व भासे ।।४।। कोठे न लगे चित्त ।
बैसवेना मज गृहांत । बाळपणीचे खेळ समस्त । किती ह्याचे आठवू ।।५।।
वंध्या धेनूचे दुग्ध किती । काढून दाविले मजप्रती । खर्जूरफले मुलांप्रती । दिली म्हणूनी ताडिले
।।६।। ऐशी मी अभागिणी । सुख न दिले बाळपणी । तव आले अश्रू नयनी । बहुत तया सतीच्या
।।७।। विद्यायुक्त गुणसंपन्न । सखाराम माझा म्हणून । कोणी करणी करुन । काननांत धाडिला
।।८।। अवलोकिता सरस्वती । म्हणे तूं न उत्तम निश्चिती । येतांचि माझ्या गृहाप्रती । सखा दुर झालासे
।।९।। ऐशापरी बहुत । अहल्या शोक करीत । सीताराम येऊन त्वरित । सांत्वन करीतसे ।।१०।। म्हणे मी
आतां जाऊनी । सखारामा आणीन शोधूनी । तूं स्वस्थ असे सदनी । कांही चिंता न करावी ।।११।। ऐसे
पुत्राचे भाषण । अहल्येस न रुचे जाण । म्हणे सख्यास आणिल्याविण । कदा न ये गृहा मी ।।१२।। तूं
आता सुखाने । प्रपंच गृही नीट करणे । सीताराम निरुपायाने । मानी मातृवचनाते ।।१३।। असो ती
अहल्या त्वरित । निघाली शोध लावीत । स्वतनयाचा निश्चित । मार्ग क्रमित जातसे ।।१४।। पथ

क्रमिता विवेक चित्ती । करीतसे ती अहल्यासती । की सखाराम काशीप्रती । पुनरपि गेला असेल
।।१५।। ऐसा करुनी दृढ विवेक । आली वाराणशीसी देख । विश्वनाथा वंदुनी आणिक । गंगेसंन्निध
पातली ।।१६।। तव तिने निजनंदन । अकस्मात अवलोकून । तयाप्रती करी भाषण । गहिवरुनी
अहिल्या ।।१७।। अरे मी थकले अत्यंत । संपवी योगसाधनाप्रत । सखारामा माझा अंत । कोठवरी
पाहसी ।।१८।। ऐसे शोकयुक्त भाषण । स्वमातेचे परिसुन । तया जली बुडी मारुन । करी स्तवन
जान्हवीचे ।।१९।। हे भागिरथी दास विनवित । मम मातेसी करी मुक्त । हिचे आयुष्य संपले निश्चित
। मिळवी आपुल्या स्वरुपी ।।२०।। तव उदकी करिता स्नान । पातकांचे होत क्षालन । दत्त विश्वनाथ
अ आदि करुन । स्नान आनंदे करिताती ।।२१।। महिमा तुझा त्रिजगती । न वर्णवे कवणाप्रती । मान्य ४०
७ करी मम विनंती । माता मिळवी स्वरुपी ।।२२।। ऐसे सखाराम संत । जान्हवीते विनवित । तंव ती
येऊन अकस्मात । वंदन करी अहल्येसी ।।२३।। जान्हवी करी स्तवन । तिजसी हृदयी धरुन । इतुक्यात
आले विमान । सुरगणांचे तेधवा ।।२४।। दिव्य विमानी अहल्येप्रत । बैसविले आदरे बहुत । पुष्पवृष्टी
करुनी अनंत । नेले स्वर्गी तियेसी ।।२५।। स्वजननी पावली मुक्ती । म्हणूनी सखाराम अती । संतोष
पाऊनी त्वरित गती । तेथोनिया निघाले ।।२६।। गृहा पत्नी करी शोक । की लवही न मिळे पतिसुख ।
व्यर्थ जन्मले मातेउदरी देख । सजीव असूनी मृतासम ।।२७।। कवण्या स्त्रीभ्रताराचा । वियोग केला
मी साचा । की मजला पतिनिंदेचा । दोष घडला असेल ।।२८।। भोजनसमयी येता ब्राम्हण । रिता
दवडिला न देता अन्न । की पंक्तिभेद घडला जाणून । पूर्वजन्मी अथवा या ।।२९।। तुळशीची

पूजा न घडली । सासूश्वशुरनिंदा केली । की पतिव्रता स्त्री अपमानिली । म्हणूनी झाला विरह हा ।।३०।। ऐशापरी ती सरस्वती । दुःखित होउनिया अती । भाषण करितसे तुळशीप्रती । प्रेमयुक्त शुद्ध भावे ।।३१।। हे तुळशी माझी तूंच । तात माता आप्त साच । नको धरु मनी संकोच । पावावया मजलागी ।।३२।। नित्य नेमे त्वदर्शन । करीन दृढ भावा धरुन । व्हावे मजला पतिदर्शन । हीच इच्छा मनासी ।।३३।। ऐशापरी तिज विनवून । आरंभी तुळशीचे अर्चन । प्रतिदिनी करुनी निरशन । शुचित्वाने राहतसे ।।३४।। कित्येक दिन लोटता यांसी । तिचे पुण्य आले फळासी । श्री सखाराम दर्शनासी । तिजला देते जाहले ।।३५।। अकस्मात प्रगटला पती । ऐसे देखूनी सरस्वती । विस्मित जाहलीसे अती । शरीरी रोमांच उठले ।।३६।। आनंदाश्रूंनी भरले नयन । सद्‌गदित झाला कंठ जाण । वंदोनी स्वपतीचे चरण । काय तया बोलली ।।३७।। अरण्यवास घडला बहुत दिन । आता न सोडावे सदन । आनंदे करु प्रपंच जाण । एवढे वचन मान्य करा ।।३८।। ऐसे ऐकता स्त्रीभाषण । सखाराम वदे तिजलागून । मी दिधले तुज दर्शन । श्रध्दा अती देखूनी ।।३९।। पूर्वी तुवा निर्धार । न केलासी साचार । जरी मम सवे येतीस सत्वर । तरी घडता प्रपंच ।।४०।। आता मम चिंतन करणे । काळ कंठी तूं सुखाने । व्रतस्थ तुवा गृही राहणे । नित्य पूजी तुळशीसी ।।४१।। ऐसे महाराज वदोनी । गुप्त झाले तत्क्षणी । तळणी ग्रामा निकट वनी । वास केला तयाने ।।४२।। सिताराम गृही शोक करी । म्हणे कां न ये जननी घरी । कोठे शोधिते सखारामाभितरी । मजला काही कळेना ।।४३।। झाले अनुष्ठान सख्याचे । चरण दुरावले मातेचे । भागीरथीसमान केवळ तिचे । दर्शन कधी होईल ।।४४।। 'सख्या'

अ ७

ऐसे म्हणून । अयोध्याधीश दशरथासमान । पित्याने सोडिला असे प्राण । सरस्वती करी अति
शोक ।।४५।। ऐसा तो असता दु:खित । ग्रामी वार्ता पसरलीसे त्वरित । की तो पिशाच अहल्यासुत
। वनी येऊनी राहिला ।।४६।। सितारामाते जन कथित । की तुझा बंधू आलासे येथ । हे परिसतांचि
तो त्वरित । निघे तया आणावया ।।४७।। सखाराम वसे जेथ । भ्राता येऊनिया तेथ । स्वबंधूते
अवलोकित । अत्यानंदे करोनी ।।४८।। सीताराम तया विनवित । की चल आता तूं ग्रामांत । वास
करी गणपती मठात । सखारामा झडकरी ।।४९।। ऐसे भाषण परिसून । सखाराम उठले तेथून ।
गणपतीमठी येऊन । वास्तव्य करिते जाहले ।।५०।। मग तया सखारामांनी । कथिले काशीक्षेत्री
अ स्वजननी । मुक्ती पावली ऐसें ऐकुनी । शोक करी सिताराम ।।५१।। असो कित्येक दिनपर्यंत । ४२
७ सखाराम वास करी मठात । तेथील वदती जन समस्त । वेडापिसा म्हणोनी ।।५२।। असो तया वेळी
रोहिल्यांची । भिती अत्यंत असे साची । लुटालुट ते खेड्यांची । तया प्रांती करती पैं ।।५३।। तळणी
लुटावी म्हणूनी । ठरविले असे तयांनी । हे जाणुनी सखारामानी । निवेदिले ग्रामस्था ।।५४।। की
एक मास होतांक्षणी । लुटतील रोहिले तळणी । स्वस्थ नसावे किमपि सदनी । उपाय झणी करावा
।।५५।। राहू नका ग्रामांत । धन न ठेवावे गृहांत । करा पलायन तुम्ही त्वरीत । अन्य ग्रामी सुज्ञ हो
।।५६।। ऐसे वदती प्रत्येका । परी न सत्य वाटले लोकां । म्हणती हा पिशाच्च सखा । कांही तरी वदतसे
।।५७।। असो डाका येणार ज्या दिनी । सखाराम म्हणे अस्तमानी । न रहावे येथे कोणी । मीही जातो
तीर्थासी ।।५८।। ऐसे वदूनी त्वरित । निघाले सखाराम संत । तीर्थयात्रा करित करित । फिरले बहुत

संवत्सर ।।५९।। इकडे तद्दिनी अस्तमानी । लुटली तळणी रोहिल्यांनी । गेले सर्व द्रव्या घेऊनी । ताडण केले बहुतांते ।।६०।। मग जन दु:खित होऊनी । म्हणती सत्य सखारामवाणी । नायकिली तयाची कोणी । म्हणूनी कोसळला दु:खगिरी ।।६१।। असो ते सखाराम संत । स्वच्छंदे रमत रमत आले 'लोणी' ग्रामाप्रत । वटवृक्षातळी बैसले ।।६२।। ग्रामी पसरली वार्ता त्वरीत । की जटाधारी महासंत । योगी एक आलासे येथ । अत्यंत तेज:पुंज जो ।।६३।। म्हणती सर्व ग्रामस्थ । चला पाहू तो संत । कैसे आचरण आचरत । स्थितीही तयाची कळेल ।।६४।। ऐसे वदोनी ते समस्त । निघते झाले काननांत । जेथे सखाराम वास करित । तया स्थानी पातले ।।६५।। अवलोकितांचि गुरुमूर्ती । कुत्सित भावना लयाप्रती । जाऊनिया शुद्ध मती । झाली त्यांची तये वेळी ।।६६।। असो सखाराम पदाप्रत । वंदिते झाले ते ग्रामस्थ । कर जोडूनी तया प्रत । काय भाषण बोलती ।।६७।। हे संता गुणगंभीरा । साधो दयाळा गुरुवरा । आपण मठांत वास करा । चला ग्रामांत सत्वरी ।।६८।। ऐसी तयांची विनवणी । सखारामे परिसुनी । उठते झाले तेथूनी । वास केला मठांत ।।६९।। त्यांच्या पुण्यप्रतापांनी । चोहोकडे ख्याती होऊनी । दुरदूरचे लोक येऊनी । दर्शन घेती प्रेमभरे ।।७०।। जैसा जैसा समर्थाचा । अनुभव येतसे साचा । तैसा तैसा भाव जनांचा । त्यांचे ठायी पूर्ण वसे ।।७१।। श्री सखारामसंतासी । सद्भावे करिता नवसासी । तात्काळ पावे तो सिध्दीसी । महाराजांच्या योगबळे ।।७२।। ऐशी अलौकिक कृती । देखुनी भाविक जन जमती । निज नवसाते घेऊनि येती । यात्रा नित्य भरतसे ।।७३।। मग सर्व पदार्थाच्या त्या स्थानी । पडू लागल्या राशी येऊनी । मार्जार श्वानादिक

प्राणी । न करिती स्पर्श तयांसी ।।७४।। समर्थांच्या आश्रमी जाण । ऋध्दि सिध्दी राबती येऊन ।
मूर्तिमंत बैसली पूर्ण । अन्नपूर्णा तये ठायी ।।७५।। इष्टदैवत गजानन । स्वाश्रमी केले स्थापन ।
भक्तांचा नवस येता अर्पण । सखाराम करी तयाते ।।७६।। अरुणोदय होताक्षणी । गणपतीमूर्ती
पुजोनी । यथाविधी नैवैद्य अर्पुनी । भोजन द्यावे ब्राह्मणा ।।७७।। ऐशापरी लोणीस जाण । नित्यशः
होत संतर्पण । या अपूर्व सोहळ्यास कोण । वर्णू शकेल न कळेची ।।७८।। धन्यत्व आले त्या
लोणीसी । आणिक तेथील सर्व जनांसी । केवळ दुजी वाराणसी । भासतसे तत्समयी ।।७९।।
असो ते सखाराम जाण । कोणाते न करी भाषण । ज्यांचे असेल थोर प्राक्तन । वदती तया
खुणेने ।।८०।। कोणी उपदेश घ्यावा म्हणून । समर्थासी जाता शरण । तयावरी कृध्द होऊन ।
आश्रमातून काढावे ।।८१।। असो समर्थांचे भोजनाचा । विलक्षण असे विधी साचा ।
डाळतांदुळादी पदार्थाचा । पात्री करी सम भाग ।।८२।। मग ते धुनीवरी ठेवूनी । परिपक्व न होता
काढूनी । त्यातील अर्धभाग घेऊनी । गो-काक-श्वाना अर्पावा ।।८३।। उर्वरीत जो राहिला शेष
। तयायोगे शांतवी क्षुधेस । ऐशापरी बहुत दिवस । क्रम चालवी सखाराम ।।८४।। पुढील अध्यायी
चमत्कृती । महाराज भक्तांते दाविती । जी अघटित असे अती । परिसा प्रेम श्रोतेहो ।।८५।।
स्वस्ति श्री सखारामलीलामृत । कर्ता करविता गिरीजाकांत । रघुपतीसी करुनी निमित्त ।
सप्तमाध्याय संपविला ।।८६।। श्री सखारामचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।।।। सप्तमोध्याय समाप्त ।।

# अध्याय ८ वा



दर्शनास अप्पादेव



श्री गणेशाय नम: ।। जयजय श्री कैलासनाथा । महादेवा उमाकांता । दास ठेवी पदी माथा । प्रेमदृष्टी असावी ।।१।। मागील अध्यायी केले कथन । अहिल्या मुक्त झाली जाण । पत्नीस देऊनी दर्शन । महाराज आले लोणीस ।।२।। तेथे महासाधू म्हणून । ख्याती बहू जाहली जाण । इकडे कैसे वर्तमान । घडले असे तळणीस ।।३।। सिताराम गेला स्वर्गासी । दु:ख जाहले सर्वांसी । वार्ता कळली सरस्वतीसी । की पती वसे लोणीत ।।४।। तेथूनी ग्राम ते जवळ । सरस्वती निघे तात्काळ । पतीदर्शनाची तळमळ । चित्ती बहू तियेच्या ।।५।। येताची ती त्या ग्रामांत । सर्व जन झाले तटस्थ । म्हणती अनुसूया आली येथ । किंवा लक्ष्मी पार्वती ।।६।। शरीर तेज:पुंज अत्यंत । वय तियेचे असे पोक्त । जेथे वसती सखारामसंत । पावली तेथे त्वरित गती ।।७।। देखतांचि स्वपत्नीसी । क्रोधावले ते मानसी । म्हणती त्वरे ग्रामस्थांसी । तळणीस न्यावे इजला पै ।।८।। मम पत्नी येथे जरी । वास करी तरी झडकरी । मी येथून जाईन दुरी । सत्य सत्य त्रिवाचा ।।९।। जन तया विनविती बहूत । हिचे वास्तव्य होऊ द्यावे येथ । देवीदर्शन आम्हांप्रत । होईल नित्य दयाळा ।।१०।। ऐशा प्रकारे बहुत । सखारामाशी प्रार्थित । परी सर्व झाले व्यर्थ । तेणे ग्रामस्थ खिन्न मनी ।।११।। म्हणती ह्यांच्या वचना मोडूनी । कशास घ्यावे हिला ठेवूनी । ऐसा विवेक करुनी झणी । नेऊनी घातले तळणीस ।।१२।। कित्येक दिनपर्यंत । माहेरी असे पतिचिंतनात । अंतकाळ तियेचा तेथ । जाहला असे श्रोतेहो ।।१३।। असो इकडे लोणी ग्रामांत । सखाराम साधू

प्रख्यात । दूरदूरचे लोक येत । नवस महाराजा कराया ।।१४।। कोणी दर्शनास्तव येती । कोणी नवसाते अर्पिती । पक्वान्न भोजन भक्तांप्रती । सूर्योदयी मिळतसे ।।१५।। ज्याचे थोर असे प्राक्तन । त्यासचि मिळे ते भोजन । महाराजांनी कित्येक दिन । कवण भक्तासी ठेवावे ।।१६।। कवणा तात्काळ घालवावे । कोणा मठी येऊं द्यावे । कोणासी कार्य सांगावे । नीच अथवा उच्च पै ।।१७।। राव आणि रंक । दरिद्री आणि धनिक । सर्व ते समान देख । तया सद्गुरुसी वाटती ।।१८।। श्री सखाराम महाराजांनी । गोरजस्नान प्रतीदिनी । प्रभाती आणि अस्तमानी । नित्य नेमे करावे ।।१९।। ऐसे चालाले सतत । चमत्कार दाविले अगणित । त्यातील वेचें संक्षिप्त । यथामती वर्णितो ।।२०।। श्रोती व्हावे सावधान । कथा परिसा पुण्यपावन । अघमोचक असे जाण । एकाग्र करा चित्ताते ।।२१।। पाथरी [१] नामे परगण्यात । मानवत [२] ग्राम जे विख्यात । तेथे एक महासंत । 'अप्पादेव' नामे झालासे ।।२२।। तयाच्या पत्नीचे जाण । 'संताबाई' नामाभिधान । केवळ सावित्रीसमान । अधिकार असे जियेचा ।।२३।। तया श्रौत अग्निहोत्र । कर्मनिष्ठा अती पवित्र । यजुर्वेदी पाराशर गोत्र । तयाचे असे श्रोतेहो ।।२४।। केवळ नारायणरुप भासत । सर्व भक्तजनांप्रत । ऐसा तो अप्पादेव संत । प्रसिद्ध असे सुज्ञहो ।।२५।। कामक्रोधादिक तस्कर । हृदयी संचरती न क्षणभर । अखंड ज्ञानज्योती साचार । पाजळतसे तये ठायी ।।२६।। सद्विवेक सदा वास करी । वैराग्य असे पूर्ण अंतरी । निरिच्छा उपरती शांती नारी । वरिले असे तिघींनी ।।२७।। अतिथी येता कोणी । सन्माने गौरवूनी ।

---

१ मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात तालुका आहे । २ हे पाथरीजवळ गाव आहे

मिष्टान्नभोजन देऊनी । संतुष्ट तया करावे ।।२८।। सप्तदश वर्षे पर्यंत । ऐसें चालले सतत । हेच मोक्षगुरु
निश्चित । मम पित्याचे असती पैं ।।२९।। असो एकदा अप्पादेव संत । जयरामबुवा सवे घेत । लोणीस
जाती दर्शनाप्रत । श्री सखारामसंताच्या ।।३०।। लोणीग्रामा निकट वनी । अप्पादेव आले जाणुनी ।
सखाराम निघाले तत्क्षणी । सामोरे तया जावया ।।३१।। जयरामा अवलोकून । जो अप्पादेवासमान ।
त्यांसी न तेथे एक क्षण । महाराजांनी ठेविले ।।३२।। तोहि निरुपाय होऊनी । गेला असे स्वसदनी । मग
श्री सखारामांनी । आलिंगिले अप्पादेवा ।।३३।। हरिहर भेट झाली जैशी । किंवा श्रीरामे भरतासी ।
आलिंगीले आदरेसी । तैशापरी जाहले ।।३४।। तया दोघांची प्रीती । एकमेकांवरी अती । उभयतांच्या
अ नयनांप्रती । आनंदाश्रू लोटती ।।३५।। असो अप्पादेव पुण्यराशी । समर्थे आणिले आश्रमासी । देवोनि 
८ मिष्ठान्न भोजनासी । तृप्त केले तयाला ।।३६।। कित्येक दिनपर्यंत । ज्ञानचर्चा दोघे करित । नवविधा
भक्तिचाही पथ । अप्पादेव पुसतसे ।।३७।। पुढती विनवित सखारामा । मम विचार संन्यासाश्रमा ।
घ्यावे वाटते नरोत्तमा । आज्ञा आपुली असावी ।।३८।। ऐसे ऐकता भाषण । महाराज म्हणती तुज
कारण । नसे आश्रमाचे जाण । सुखे चालवी श्रौत कर्मा ।।३९।। तुझे मनीचा हेत । की व्हावे उपकारमुक्त
। स्वजननीच्या निश्चित । परी न त्यात बद्ध तूं ।।४०।। मृत्युलोकी येऊन । अचल सत्कीर्ती करी जाण ।
ईशभक्तिचा जिव्हाळा पूर्ण । जाणे तोचि मुक्त असे ।।४१।। ऐसे अन्य प्रकारेकरुन । वदले
उपकारमुक्तीचे ज्ञान । परी अप्पादेवांचे मन । निःशंक कदा न होय ।।४२।। असो महाराजाज्ञा घेउनी ।
अप्पादेव गेले स्वस्थानी । विद्वान द्विजा पाचारुनी आश्रमाचे ठरविले ।।४३।। सर्व विधी

संपवून । यज्ञोपवित त्यागिले जाण । तव अकस्मात दुजे येऊन । कंठी पडे ब्रम्हसुत्र ।।४४।। ऐसे देखुनी अघटीत । विप्र झाले सर्व चकित । अप्पादेवांनी त्वरित । तेही सत्वर त्यागिले ।।४५।। पुन्हा तृतीय यज्ञोपवीत । तया गळां येऊनी पडत । सुवर्णासम असे झळकत । अप्पादेव संकोच ।।४६।। म्हणे मज सखाराम । घेऊ न दे संन्यासाश्रम । कोपेल अग्निनारायण मम । म्हणूनी केले सर्व रहित ।।४७।। दृष्टांत झाला त्याच दिनी । वदले नारायण तया स्वप्नी । की तूं सखारामाज्ञा उल्लंघुनी । संन्यास कैसा घेतोसी ।।४८।। तयाचे करण्या सत्य वचन । मीच यज्ञोपवीत अर्पिले जाण । ऐसें अवलोकोनी पूर्ण । अप्पादेव सद्गदित ।।४९।। मग सखाराम महाराजांची । विनवनी केली असे साची । की माझे आता अपराधाची । क्षमा करावी दयाळा ।।५०।। असो ते अप्पादेव संत । शके अठराशे सातात । जेष्ठमासी कृष्णपक्षांत । समाधिस्थ झाले प्रतिपदेसी ।।५१।। तयांची पुण्यतिथी । अद्यापी मानवती । समारंभाने लोक करिती । जाणा तुम्ही सूज्ञ हो ।।५२।। जे जे महाराजा जाती शरण । त्यांच्या कामना होती पूर्ण । धर्म भक्ति पंथासी जाण । बहुत जना लाविले ।।५३।। गोदावरीचे तीरी जाण । ग्राम एक रामस म्हणून । तेथील कुलकर्णी नामभिमान । 'रायजी' ज्याचे असे हो ।।५४।। जिंतूर नामी परगण्यात । मोहरीर असे तो ब्राम्हणीत । सखारामसाधूची मात । श्रवण केली तयाने ।।५५।। महायोगी दयाळू संत । सद्भक्तांची वासना त्वरित । दर्शन घेताची पूर्ण करीत । श्री सखाराम नामे जो ।।५६।। कधी जाईन मी लोणीसी । पाहीन कधी संतपदांसी । ऐसी आतुरता मानसी । बहूत दिनतयाच्या ।।५७।। पूर्वपुण्यनिधी उचंबळला । तयायोगे तो लोणीस निघाला । महाराजांच्या आश्रमी गेला । मस्तक ठेविले तत्पदी ।।५८।। महाराज स्पर्श कवणाते । करु न देती स्वपदांचे । परी हा स्पर्श करिता त्याते । कांही न वदती समर्थ ।।५९।।

आपुल्यासारिखे करिती तत्काळ। तयालागी नाही काळवेळ। हे तुकयाचे वाक्य प्रेमळ। सप्रमाण येथ जाहले ।।६०।। जरी उपमा लोहपरीसाची। द्यावी तरी योग्य न साची। तो तया करी स्वर्णचि। न करी की स्वसमान ।।६१।। असो तया रायजीची जाण। वृत्ती जाहली। ईशरुपी तल्लीन। सर्व भूतांचे ठायी मन। ईश्वरासमान जाहले ।।६२।। सर्व जगतामाजी व्यापून। परमात्मा उरला असे जाण। मिथ्या भासे प्रपंच पूर्ण। तया रायजीलागी पै ।।६३।। मायाबंधातूनी झाला मुक्त। ईशभक्तिचा जिव्हाळा मनात। प्रयत्नेविण बिंबला त्वरीत। रायजीच्या श्रोतेहो ।।६४।। कामक्रोधादिक षड्वैरी। उभे न राहीले क्षणभरी। शांती क्षमा उपरती नारी। कंठी मिठ घालिती ।।६५।। ब्रम्हानंदी लागली टाळी। कोण देहाते सांभाळी। ऐसी स्थिती जाहली सगळी। तयावेळी रायजीची ।।६६।। असो गुरुपदांते वंदून। निघाला तो काननी जाण। मुखी चाले ईशचिंतन। चित्ती वैराग्य बाणले ।।६७।। जाहली पिशाच्च त्याची वृत्ती। श्रीसखारामासम निश्चिती। प्रपंचातील सौख्याप्रती। धिक्कारिले तयाने ।।६८।। तयाच्या आप्तजनांनी जाण। प्रपंची वळवावे म्हणून। उपाय योजीले अत्यंत कठिण। परी झाले निरर्थक ।।६९।। असो सद्‌गुकृपे देख। रायजी भोगी मोक्ष सुख। संत महिमा अलौकिक। कवणाप्रती न वर्णवे ।।७०।। जे जे महाराजा शरण जाती। ते ते लोक कृतार्थ होती। त्यांची अघोर पातके जळती। निश्चयत्वे जाण पैं ।।७१।। बहूत चमत्कृती दावून। धन्य करिता अज्ञान जन। श्रोते होऊन सावधान। पुढील कथा परिसावी ।।७२।। द्विज एक विदर्भदेशस्थ[1]। नाम ज्याचे भोलानाथ। जन्ममृत्युपासूनी मुक्त। व्हावे तया वाटले ।।७३।। कवणाते जावे शरण। कोण मला करील पावन ऐशा परी रात्रंदिन। विवेक चित्ती करीतसे ।।७४।। धन्य धन्य हा नरदेहो। येथिल अपूर्वता पहा हो। जो जो कीजे परमार्थ लाहो। तो तो पाहो सिद्धीते ।।७५।। हे

रामदासाचे वचन। कधी दावील सत्य करुन। मम देहाची सार्थकता पूर्ण। कधी होईल म्हणतसे ।।७६।। असो एक दृढ निश्चय त्यांनी । मनामाजी पूर्ण करुनी । लोणार[1] क्षेत्रासी जाऊनी । सरोवरासंन्निध पातला ।।७७।। तये ठावा जाज्वल्य दैवत कमलजा देवी मूर्तीमंत तेथें जाऊनी भोलानाथ। घोर तप आचरे ।।७८।। निस्सीमभावे प्रेमयुक्त। द्वादश संवत्सरपर्यंत। तपश्चर्या तो आचरत। जगदंबा प्रसन्न व्हावया ।।७९।। अती तप जाहले म्हणून। कमलजा प्रगटली जाण। वरं बृहि[2] शब्द बोलून। भोलानाथा ऊठवी ।।८०।। भोलानाथ अवलोकुनी। आदिमाता जगज्जननी। साष्टांग नमन तिचे चरणी। भक्तिभावे करितसे ।।८१।। म्हणे मी योनी चौऱ्यांशी लक्ष। फिरुनी त्रासलो अति, लक्ष। सत्कर्मी लागो देई मोक्ष।चुकवी जन्ममरणातें ।।८२।। परिसुनिया ऐसे भाषण। जगदंबा वदे तयालागून। मोक्ष न मिळे सद्गुरुवाचून। भोलानाथ कदापी ।।८३।। येथून सन्निध लोणीग्राम।तेथें संत श्री सखाराम। भाव ठेवूनिया निस्सीम । शरण तया जाई तूं ।।८४।। तो केवळ भक्ताधीन। तुझी कामना करील पूर्ण। ऐसे जगदंबा वदून। गुप्त झाली तत्क्षणी ।।८५।। भोलानाथही तेथून। लोणीस जावया कारण। मनी अति उत्सुक होऊन। मार्ग क्रमिता जाहला ।।८६।। पुढील अध्यायी भोलानाथ। शरण जाईल सखारामाप्रत। सखाराम त्याते रुक्मिणीकांत। दावुनी मुक्त करतील ।।८७।। स्वस्ति श्री सखारामलीलामृत। कर्ता करविता गिरीजाकांत। रघुपतीसी करुनी निमीत्त। अष्टमाध्याय संपविला ।।८८।। श्री सखारामचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।। ।। अष्टमोध्याय समाप्त ।।

---

१ हे गाव लोणीहून चार कोसावर मेहकर बुलडाणा तालुक्यात आहे । २ वर माग तुला काय पाहिजे ते मागून घे

# अध्याय ९ वा



भोलानाथास भगवान दर्शन



।।श्री गणेशाय नमः।। जय जय श्री शिवशंकरा । गजानन ताता उमावरा । पुढती काव्य वदती हरा । प्रेमळ अती मम मुखे ।।१।। मागील अध्यायी झाले कथन । की तो भोलानाथ ब्राम्हण । मार्ग क्रमित निघाला जाण । लोणीग्रामी जावया ।।२।। महाराजाश्रमी तो येऊन । सखारामाते केले नमन । निवेदितसे वर्तमान । घडले असे जे लोणारी ।।३।। की जी कमलजा देवी प्रख्यात । तेथे अनुष्ठान अत्यंत । केले असे स्वोद्धारार्थ । तव ती प्रसन्न जाहली ।।४।। म्हणे ती मजला प्रेमयुक्त । की तूं जाई लोणीप्रत । वंदी श्रीसखाराममसंत । गणेशभक्त पूर्ण जो ।।५।। कृपादृष्टी होता जयाची । तृप्तता होईल तव इच्छेची ऐसी जगदंबावाणी साची । वदली म्हणोनी आलो मी ।।६।। हे दयाळा करुणाकरा । अनाथनाथा योगीश्वरा । कृपादृष्टीने या किंकरा । पूर्णपणे विलोकी ।।७।। ऐसे परिसुनियां भाषण । भोलानाथद्विजाचे जाण । सखाराम वदती त्यालागुन । आदौ भोजन करी तूं ।।८।। तो म्हणे वरप्रदान । दिल्यावचुन मी अन्न । कदापि न करी सेवन । संतराया दयानिधे ।।९।। ऐकुनियां तद्भाषण । महाराज म्हणती तुझी पूर्ण । होईल इच्छा सर्व जाण । आदौ भोजन करी तूं ।।१०।। आग्रह देखुन ऐशापरी । भोलानाथ भोजन करी । भोजन संपताचि सत्वरी । वदले ऐसें महाराज ।।११।। की भोलानाथ सुभक्ता । मजसवे चलावे आता । दावितो तुला पंढरीनाथ । षड्गुणैश्वर्यसंपन्न जो ।।१२।। ऐसें वदोनी ते संत । निघते झाले काननांत । सवे निघे भोलानाथ । घोर मार्ग क्रमिताती ।।१३।। महाराज अंतरी योजिती । की याची निस्सीम भक्ती । मम ठायी आहे

कवण्या रीती । पहावी कसोटी लावूनी ॥१४॥ ऐसा विवेक करुनी । निर्मिले मायिक वन ते क्षणी । ते परिसा चित्त देऊनी । पुढे कैसे वर्तले ॥१५॥ महाभयानक गिरी । बहुत दिसती सत्वरी । सूर्यरश्मी तया अवसरी । भोलानाथ दिसेना ॥१६॥ पिंपळ, निब, औदुंबर,। वट, जांभळी तरुवर । आम्रवृक्षादी थोर थोर । गगनचुंबित असती पैं ॥१७॥ दारुण पडला अंधःकार । श्वापदे गर्जती भंयकर । कंटक रुतती चरणी थोर । तया भोलानाथाच्या ॥१८॥ व्याघ्र, वृक मुख पसरुन । भोलानाथा सन्निध येऊन । जणो आताचि करिती भक्षण । ऐसे तया वाटले ॥१९॥ काळसर्पत्वरे येऊनी । वेढा घाली तयाचे चरणी । विंचू करिती दंश झणी । तया भोलानाथासी ॥२०॥ अत्यंत कष्ट ऐशापरी । द्विज तो निर्धारे सहन करी । समर्थाच्या मागे सत्वरी । दृढनिश्चयें चालला ॥२१॥ कसासी उतरला पूर्ण । ऐसे समर्थांनी देखून । प्रेमे तयाचा कर धरुन । पर्वतशिखरी नेलेसे ॥२२॥ म्हणती आतां स्वचित्त । शांत करी भोलानाथ । येथे तुला पंढरीनाथ । दर्शन देईल निश्चये ॥२३॥ ऐसे वदोनी त्वरीत । आळवी सखारामसंत । श्रीविठ्ठलासी प्रेमयुक्त । दर्शन देण्याकारणे ॥२४॥ हे रुक्मीणीकांत दयाघना । शाई.गधर मधुसूदना । हषीकेशा पतीतपावना । येई आता लवलाही ॥२५॥ हे हरे मुरारे गोविंदा । श्रीधर कृष्णा मुकुंदा । पद्मनाभा आनंदकंदा । येई मजसी भेटाया ॥२६॥ पुंडलीक भक्तासाठी । वास्तव्य केले भीमातटी । अनदिसिद्धा अनंत कोटी । भक्ता तुवां तारिले ॥२७॥ हे नारायणा जगच्चालका । माधवा विष्णू भक्तपालका । तव दास विनवीतसे देखा । येई आता धावत ॥२८॥ कोठे गुंतलासी  अधोक्षजा । कोणाच्या पुरविसी काजा । कां

येतांना रुक्मीणीने तुझा। कर धरुनी बसविले॥२९॥ ऐशापरी विनवणी साची। ऐकता श्रीसखारामाची । श्रीकृष्णमुर्ती त्वरितची । प्रगट तेथें जाहली ॥३०॥ सहस्त्र रवीसमान । तेज पसरले असे जाण । सुवर्णकिरीट झळके पुर्ण । मस्तकावरी जयाच्या ॥३१॥ कुंडले कर्णी तळपताती । वैजयन्ती माळ शोभती । कटी पीतवसनाप्रती । वेष्टिले असे जयाने ॥३२॥ शंख, चक्र, पद्म, गदा । चारही करी धरिली तदा। संहारिती जी त्वरीत मदा। जो करी विध्ने भक्तांसी॥३३॥ अजानुबाहू तो जाण। देह ज्याचा शामवर्ण। मोहक अति मदनाहुन। शतगुणित दिसतसे॥३४॥ असो वैकुंठवासी त्रिभुवननायक । जो सकल विश्वाचा चालक। जया वर्णिती चार वेद देख। तो पातला भक्तास्तव॥३५॥ शेषावरी करी जो शयन । नारद तुंबर करिति गायन । अप्सरा हावभाव दावून । ज्याच्यापुढे नाचती ॥३६॥ ऐशापरी सर्व सुख। नावडे जया किमपी देख। स्वभक्त महिमा अलौकिक। वाढवावा हे ब्रीद ज्याचे ॥३७॥ असो ती मुर्ती विलोकून। सखाराम करी पदी नमन। भोलानाथाचे दीपले नयन। न होई सहन तेज ते ॥३८॥ मग सखाराम धरी त्याचा कर । म्हणे हा पाही जगदीश्वर । पूर्ण ब्रम्हचि हा साचार । श्रीकृष्ण परमात्मा ॥३९॥ हाचि गोकुळी अवतरला । वसुदेवाचा कुमर झाला । ह्यानेच कंसासुर मर्दिला। भक्त रक्षिण्याकारणे॥४०॥ अर्जुनरथी सारथ्य केले। गजेंद्रासी मुक्त केले। कावडीने पाणी वाहिले। एकनाथगृही ह्यानेची॥४१॥ नरसिंह मेहत्याची हुंडी। ह्यानेच पटविली तांतडी। शेल्याची हा बांधी घडी। कबिरागृही जाण बा॥४२॥ जनाबाईची धुणी धुतली। दामाजीची रसीद भरली। कान्होपात्रा

मुक्त केली । भोलानाथ ह्यानेची ।।४३।। ऐशा प्रकारे बहुत । निवेदुनी सर्व वृत्तान्त । सद्‍गुरु म्हणती भोलानाथ । नमन करी विठ्ठल पदी ।।४४।। ऐसे ऐकता संतवचन । वंदिता झाला प्रभुचरण । आनंदाश्रूनी भरले नयन । कंठ प्रेमे दाटला ।।४५।। म्हणे हे दयानिधे ईश्वरा । दासावरी करुणा करा । या समर्थयोगे श्रीधरा । भेटलासी मजलागी ।।४६।। असो तो जगदीश्वर । भोलानाथशिरी ठेवी कर । म्हणे तूं वचन निरंतर । ऐक सखारामाचे ।।४७।। ऐसे वदोनी जगज्जीवन । गुप्त झाला न लागता क्षण । मग भोलानाथ वंदी चरण । श्री सखारामसंताचे ।।४८।। म्हणे तव योगे माझे नयन । ईश्वरमूर्तीसी अवलोकन । करण्यास झाले समर्थ जाण । किती ही शक्ति अलौकिक ।।४९।। असो आता दासप्रती । सायुज्यमुक्तीचे साधन कथी । जेणे जन्म-मरण फेरे चुकती । श्रीसखारामागुरुवर्या ।।५०।। समर्थ वदती तयासी । तूं जावे तीर्थयात्रेसी । मुखे घेई ईशनामासी । कलियुगी जे श्रेष्ठ असे ।।५१।। ऐसे परिसुनी संतवचन । तीर्थयात्रेसी निघे तो जाण । सखारामही लोणीस येऊन । वास्तव्य करिते जाहले ।।५२।। ऐशापरी चमत्कार अनंत । मूढ लोकांते दावूनी समर्थ । भक्तिपंथाते लाविती त्वरित । इतिहास ऐसा येविषयी ।।५३।। वाशीम[१] नामे जिल्हयांत । जो पूर्वी असे प्रख्यात । तयाचा अधिकारी असत । फिटीजर नामे प्रसिद्ध ।।५४।। तपासणीस निघे एके दिनी । लेखक [२] समागमे घेऊनी । भास्करभाऊ नामाभिधानी । जाती विप्र जयाची ।।५५।। फिरत फिरत मोपेसी । आले असती मुक्कामासी । लोणीपासूनी त्या ग्रामासी । अंतर

एक कोस असे ।।५६।। द्वितीय दिनी प्रात:काळी । भास्कर जात अधिकाऱ्याजवळी । म्हणे सखारामपदकमळी । माझे चित्त लागले ।।५७।। येथुनी सन्निध ग्राम लोणी । तेथे सखाराम थोर मुनी । तयाचे दर्शना घेउनी । सत्वर येथे येईन मी ।।५८।। ऐसे ऐकता भाषण । आज्ञा दिधली तया जाण । म्हणे सत्वर दर्शना घेऊन । आजि आले पाहिजे ।।५९।। होकार तया देऊन । भास्कर लोणीस येऊन । सखारामचरणाते वंदून । आज्ञा मागे जाण्यासी ।।६०।। सखारामे तया देखून । म्हणे रहावे आजिचा दिन । ऐसे ऐकता भाषण । भास्कर मनी घाबरे ।।६१।। की आता न जावे तरी । क्रोधावेल ममाधिकारी । गुरुवचन मोडावे जरी । हेही बरवे नसेचि ।।६२।। ऐसा विवेक करी भास्कर । तिकडे काय करी फिटिजर । द्वितीय दिनी उगवता भास्कर । विचार मनी करितसे ।।६३।। हिंदुचे साधु अधिकारी । नसती केवळ नरनारी । भुलविण्यास्तव अवनीवरी । हिंडती जटा वाढवुनी ।।६४।। तैसाचि सखारामसंत । असेल ऐसे वाटे मनात । परी प्रचिती पाहूं म्हणुनी त्वरीत । लोणीग्रामी पातला ।।६५।। तुरंग[1] बांधुनी वृक्षासी । निघाला तो दर्शनासी । मठासंन्निध विहिरीपाशी । फिटिजर आला सत्वरी । ।६६।। महाराज देखता तेथुनी । अर्कासम[2] दिसे तेज नयनी । नेत्र त्याचे गेले दिपोनी । पुढे पाऊल न टाकवे ।।६७।। दामाजीस्तव नृपासी । जैसे तेज दावी हषीकेशी । तैसेंच या फिटिजरासी । भास्करास्तव झालेसे ।।६८।। असो तो फिटिजर जाण । तेथोनीच महाराजा वंदून । स्वस्थानाप्रति येऊन पाचरिले भास्करा ।।६९।।

---

१घोडा । २ सुर्यासारखे ।

पाचारण आले देखुनी । भास्कर चिंताक्रांत मनी । ओढवले विघ्न म्हणोनी । विवेक करी मानसी ।।७०।। मग महाराजासंन्निध जाऊन । करी तयाप्रती भाषण । मज घेतले असे ठेऊन । आज न बरवे दिसतसे ।।७१।। अधिकारी करी पाचारण । आज्ञा द्यावी मज तूर्ण । आता लज्जा राखणे संपूर्ण । तुमचेकडे दयाळा ।।७२।। हे सखारामे परिसून । आज्ञा दिधली तया जाण । मग भास्कर त्वरीत येऊन । अधिकाऱ्यापाशी बैसला ।।७३।। तया देखतां फिटिजर । म्हणे तुमचा साधू ईश्वर । पूर्ण कळले मज साचार । भास्कर चकित होतसे ।।७४।। त्याच्या आग्रहावरुन । फिटिजर करी निवेदन । जे घडले ते वर्तमान । आणिक तया काय वदे ।।७५।। म्हणे घेऊनी रुप्यकशत[1] । अर्पी सखारामरायाप्रत । मग तो द्रव्य घेऊनि येत । महाराजांच्या मठासी ।।७६।। महाराजांनी देखतां धन । म्हणती भिक्षुका करी अर्पण । संतुष्ट होतील ते पूर्ण । येथे न काही ठेवावे ।।७७।। तैसेच भास्कर करी । गुरुवचन विश्वास धरी । म्हणे कृपा केली मजवरी । लज्जा रखिली सखारामे ।।७८।। असो तया दोघांनी । महाराजाज्ञा घेऊनी । गमन केले स्वकृत्यालागुनी । होउनी आश्चर्यचकित ।।७९।। पुढील अध्यायी सखारामसंत । चमत्कार दाविती अघटित । ते ऐकता तुमचे चित्त । चकित अती होईल ।।८०।। स्वस्ति श्री सखारामलीलामृत । कर्ता करविता गिरिजाकांत । रघुपतीसी करुनी निमित्त । नवमाध्याय संपविला ।।८१।। श्रीसखारामचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।। ।। नवमोध्याय समाप्त ।।

---

१ शंभर रुपये

## अध्याय १० वा



पुंजाजी आंबे तोडून नेतो

पति–पत्नी आजारी मुलास महाराजांकडे आणतात.

वाल्हू तेल्याच्या घाण्यावर १ शेर करडीचे तेल



।।श्री गणेशाय नमः।। हे कृपासिंधो भक्तोद्धारका। अज्ञानतमविध्वंसका। नीलग्रीवा भवभयमोचका। त्रिपुरांतका पाव मसी ।।१।। मागील अध्यायीचे निरुपण। भोलानाथ देऊनि ईशदर्शन। फिटिजरांते चकित करुन। धाडिला असे स्वग्रामा ।।२।। असो एक पुंजाजी नांवाचा। पाटील होता लोणीचा। एक आम्रवृक्ष तयाचा। शुष्क अति झालासे ।।३।। बहुत दिनांपासून। होता तो पल्लवहीन। फलही तया कधी जाण। आले नसे एकही ।।४।। तरुचे भाग्य उदया आले। म्हणूनी महाराज तयाखाली बैसले। नित्यक्रमही तेथेच चाले। जे जे होते तयांचे ।।५।। यांसी होता कांही दिन। तरुस पल्लव फुटती नूतन। आश्चर्य करिती सर्व जण। संतमहिमा वर्णित ।।६।। पुंजाजीस करिती भाषण। की तव वृक्षासी फले तूर्ण। येतील आता करी अर्पण। महाराजांशी आम्र हा ।।७।। त्यांच्याच पुण्याप्रतापांनी। पर्ण फुटले तया झणी। आता कांही शंका मनी। आणूं नये पुंजाजी ।।८।। ऐकूनी त्याचे हे भाषण। तो म्हणे मी अर्पण। श्रीसखारामासी जाण। आम्रवृक्ष केलासे ।।९।। यासी होता मास चार। वृक्षासी आला फलभार। हे देखुनी चिंतातुर। पुंजाजी झाला अंतरी ।।१०।। म्हणे मी वृक्ष वृथा। अर्पिला असे ह्या संता। फळे आली ही ईश्वरी सत्ता। महाराजांची नव्हे ।।११।। ऐसा करुनी विचार। वृक्षासमीप आला सत्वर। उतरोनिया फलभार। गृही आला सत्वरी ।।१२।। महाराज पूर्ण अंतर्ज्ञानी। हे कृत्य जाणिले तयांनी। चमत्कार जो दाविला तत्क्षणी। तो श्रोती परिसावा ।।१३।। पुंजाजीचा

कुमार। व्याधिग्रस्त झाला सत्वर। तळमळू लागे अपार। दु:ख न सहन करावे त्या ।।१४।। तया
बालका देखून। माता करितसे रुदन। पतीस वदे गहिवरुन। क्षोभ झाला संताचा ।।१५।। मम
बालक प्रात:काळी । क्रीडतसे आळोआळी । कैसी आता मुखकमळी । निस्तेजता पातली
।।१६।। ऐसा शोक अपार। करुनी ती सत्वर। पतीस सांगे की फले सादर। महाराजांसी समर्पा
।।१७।। ऐसे शब्द पडता कर्णी । पुंजाजी दचकला मनी । म्हणे ही असे सत्य करणी ।
श्रीसखारामसंताची ।।१८।। तत्काळ बालका घेऊन। महाराजासंन्निध बैसे येऊन। म्हणे द्यावे
प्राणदान । मम बाळासी दयाळा ।।१९।। मी अपराधी असे पूर्ण । दुर्मती दुराचारी मलिन ।
आम्रफले आणिली तोडून। कुत्सितभावा धरुनी ।।२०।। हे दयाळा जगदोद्धारका। पतितपावना
भक्तरक्षका। आणखी एका आम्रवृक्षका। अर्पीन बाळा गुण देई ।।२१।। नि:सीम भावा देखून।
महाराज विभूति घेऊन। देते झाले तया जाण। म्हणती लावी बालका ।।२२।। तैसेच केले पुंजाजीनी
। मग संतपदांसी वंदूनी। जाता झाला स्वसदनी। तत्काळ बालका गूण पडे ।।२३।। पूर्ववत ते झाले
झणी। बाळ देखिले पुंजाजीनी। महाराजा आम्र अर्पुनी। आशीर्वाद घेतला ।।२४।। ऐसे दावुनी
चमत्कार। मूढ लोकांते सत्वर। मार्ग भक्तीचा साचार। सखाराम दावी अज्ञाना ।।२५।। असो त्या
लोणीग्रामांत । वाल्हू नामे तेली वसत । सात्विक आणि श्रद्धावंत । सद्विवेकी सन्मार्गी ।।२६।।
त्याचीही सखारामचरणी। भक्त जडली अंत:करणी। नि:सीमभावे रात्रंदिनी। सेवा करी संताची
।।२७।। उद्योग सर्व प्रपंचाचे। वाल्हूने सोडिले साचे। सर्व काळ सखारामाचे। सन्निध प्रेमे तिष्ठतसे

।।२८।। दारिद्र्याने तया अत्यंत। पिडीले तरी त्याचे चित्त। उद्विग्न न होय राहे शांत। सर्व काळ श्रोते हो ।।२९।। असो सखाराम प्रतिदिवशी। जातांना गोरजस्नानासी। घेऊनी रंभाफलकवचासी[1]। वाल्हूचे गृही टाकावे ।।३०।। तोही तयांते घेऊन। चाखीतसे प्रेमे जाण। ऐशापरी कित्येक दिन। क्रम चालला तेधवा ।।३१।। वाल्हूची कांता चित्ती। तळमळ करितसे अति। म्हणे प्रपंची माझा पती। चित्त कांही न देई ।।३२।। द्रव्यांवाचून संसार। कैसा करुं मी साचार। उद्योग न करी क्षणभर। कितीही बोधिता पतीसी ।।३३।। भांडी पात्रे नग समस्त। विकली चालविण्या चरितार्थ। आता काहीच नसे गृहांत। पुढती कैसे होईल ।।३४।। व्यर्थ पडले ह्याच्या पदरी। सुख न मिळे तिळभरी। किती दैव फुटके तरी। मजला काही कळेना ।।३५।। आप्तवर्ग करीता निंदेसी। त्याची लज्जा नसे पतीसी। सर्व काळ त्या जोगड्यासी। अहर्निश भजतसे ।।३६।। करिती जन कुचेष्टेसी। कैसी इर्षा नसे पतीसी। सर्व काळ त्या जोगड्यासी। अहर्निश भजतसे ।।३७।। जरी झाला तो प्रसन्न। काय देईल राखेविण। कैसे हे पतीलागून। न कळे भजे व्यर्थ त्या ।।३८।। साधू कशाचा हा दयाळ। माझ्या प्रपंच्याचा काळ। ह्यानेच पाडिली असे भुरळ। खचित माझ्या पतीसी ।।३९।। आता संसारसुखासी। अंतरले मी निश्चयेसी। येथे हा जोगडा कशासी। आला असे कळेना ।।४०।। ऐसा विचार करी सदनी। इतुक्यात पती आला देखुनी। तया कु-शब्दे ताडन करुनी। म्हणे पुरे साधुसंग ।।४१।। चित्त द्यावे प्रपंचात। कांहीच न उरले गृहात। धन मिळवा थोडे बहुत। नाद सोडा तयाचा ।।४२।। माध्यान्हीची पडते भ्रांती। याची

१ केळीची सालपटे

न वाटे कैसी खंती। ऐशापरी गांजी अति। स्वपतीसी श्रोते हो ।।४३।। परी वाल्हूसी या शब्दांचा
। मनी न वाटे खेद साचा। महा शांत तो धैर्याचा। पुतळा केवळ असे पै ।।४४।। असो तो वाल्हू
द्वितीय दिनी। समर्थापाशी येताक्षणी। त्याची स्थिती सर्व जाणोनी। सखाराम तया काय वदे
।।४५।। घे ह्या करडी शेरभर। टाकी घाण्यात सत्वर। तेल निघेल याचे अपार। विक्रय करी
बाजारी ।।४६।। ऐसे संतवचन परिसुनी। वाल्हू स्वसदनी येऊनी। करडी घाण्यात टाकुनी। तेल
काढूं लागला ।।४७।। पत्नी म्हणे हे अवलोकुन। एक शेर करडी टाकिल्या आणून। घाणा
कैसा चालेल जाण। कैसे केले न कळेचि ।।४८।। आता मात्र तुम्हासी। वेड लागले निश्चयेसी
। वाल्हू नायके स्त्रीवचनासी। घाणा चालवी सद्भावे।।४९।। असो एक शेर करडीचे। तेल निघाले
अ अपार साचे। अद्भुत कृत्य संताचे। कोणासी ते न वर्णवे ।।५०।। मग तो हर्षयुक्त होऊन। जायेसी ६०
१० करी भाषण। की तूं माझ्या गुरुलागुन। निंदीत होतीस की ।।५१।। पाही माझ्या सद्गुरुनाथ।
दीनदयाळू महासमर्थ। आता तरी तयाप्रत। सहसा निंदू नको तूं ।।५२।। भक्तकामकल्पद्रुम। तो
हा माझा सखाराम। पूर्ण होईल तुझा काम। शरण जाई आता तरी ।।५३।। ऐसी देखूनी चमत्कृती
। कांतेचीही जडली प्रिती। करी अनन्यभावे भक्ती। निरभिमान होऊन ।।५४।। असो इकडे
बाजारी। वाल्हू तेलविक्रय करी। द्रव्य त्यासी लाभले भारी। महाराजप्रसादे ।।५५।। तेव्हापासून
वाल्हुचे। दारिद्र्या विलया गेले साचे। थोर महात्म्य संताचे । देवाहुनी श्रेष्ठ जे ।।५६।। असो एक
लोणीग्रामांत। पाटील राघोजी वसत। उदार धीर आणि शांत। महाराजसेवेसी तत्पर।।५७।। त्याने

विवेक मानसी । केला की जावे लोणारासी । सोमवतीच्या पर्वणीसी । स्नान तेथे करावे ॥५८॥ ऐसा विचार करुन । महाराजाज्ञा घ्यावी म्हणून । बापुदेवा सवे घेऊन । संतदर्शना पातला ॥५९॥ तया वेळी त्या ग्रामांत । कोणी योजिता कृत्य मनात । आरंभावे आज्ञा त्वरित । घेऊनी तया संताची ॥६०॥ कृत्य करिता आज्ञेविण । ते न सिद्धीस जात जाण । म्हणून राघोजी येऊन । श्रीसखारामा विचारी ॥६१॥ की आम्ही लोणार ग्रामा । जावया योजिले गुणधामा । सोमवती पर्वणीचा महिमा । बहुत असे म्हणूनी ॥६२॥ आम्हा घडेल तीर्थस्नान । सर्व पातके होतील दहन । म्हणून आता आज्ञा पूर्ण । द्यावी आम्हा दयाळा ॥६३॥ सकल तीर्थांचे जे तीर्थ । श्रीसखाराम समर्थ । तया सोडुनी स्नानार्थ । कशास लोणारी जाती पैं ॥६४॥ गंगा भागिरथी आदि करुन । ज्या सद्गुरुचे इच्छित दर्शन । तया सोडुनी दोघे जण । स्नानार्थ जाती लोणारी ॥६५॥ ईश्वर असुनी अंतरी । मूढ जन हिंडती गिरिकंदरी । परिस जवळीचा टाकुनी दुरी । जैसे सुवर्णा शोधावे ॥६६॥ ऐशापरी केले दोघांनी । सद्गुरुआज्ञेते घेऊनी । गेले लोणार क्षेत्रालागुनी । सोमवती पर्वणी साधाया ॥६७॥ स्नान करुनी बाहेर । येताक्षणीच समोर । श्रीसखाराममूर्ती साचार । तया दोघा दिसतसे ॥६८॥ बापू आणि राघोजींनी । संतपदाते वंदुनी । लोणीग्रामा त्वरे येऊनी । जनांप्रती वदताती ॥६९॥ की सखाराम महासंत । आता असे लोणारग्रामांत । तेथील वदती जन समस्त । तुमचे अनृत भाषण ॥७०॥ आम्ही येथे प्रतिदिनी । देखिले सखाराममुनी । पहा आता तुम्ही झणी । महाराज असती आश्रमी ॥७१॥ जव देखती सखारामसमर्थ । तव मनी होती अति

विस्मित । म्हणती ऐसे कैसे विपरीत । सद्‌गुरुनाथे केलेसे ।।७२।। चकित होऊनी नमत । सद्‌गुरुमहिमा वर्णितात । म्हणती येथे मूर्तीमंत । सांब वसे न कळे की ।।७३।। असो वरील बापू जोशी । वाकदग्रामीचा निश्चयेसी । एके दिनी येत लोणीसी । श्रीसखारामदर्शना ।।७४।। महाराजाश्रमी येऊन । वंदिले सद्‌गुरुचरण । समर्थांनी तया देखून । गोधूमचूर्ण दिधले ।।७५।। देऊनिया प्रसादाते । महाराज म्हणती बापूते । जावें आता स्वग्रामाते । प्रेमभरे शांत चित्ते ।।७६।। सद्‌गुरुआज्ञा घेऊन । बापूदेव निघाला जाण । गृही येता अवलोकून । पत्नी करी प्रसादा ।।७७।। पतीस म्हणे आनंदयुक्त । की महाराजांनी शर्करेप्रत । दिधले आपणासी बहूत । भाग्योदय झाला वाटते ।।७८।। बापूदेव चकित मनी । होऊनी म्हणे समर्थानी । दिधले गोधूमचूर्णालागुनी[1] । शर्करा कैसी जाहली ।।७९।। असो कृपा महाराजांची । आपणावरी आहे साची । ऐसे म्हणून आनंदाची । लहर तया येतसे ।।८०।। हर्षभरित जाहला अत्यंत । सर्वांसी सांगे स्वहृद्‌गत । की श्रीसखाराम समर्थ । कृपा करी मजवरी ।।८१।। ऐसे वाकदग्रामात । चोहोकडे केले प्रख्यात । लोणीसही येऊन त्वरीत । अघटित कृत्या प्रगट करी ।।८२।। यासी होता कांही दिन । पुनरपी बापूदेव जाण । आला दर्शनालागून । श्रीसखारामसंताच्या ।।८३।। तयाते अवलोकून । समर्थ क्रोधावले पूर्ण । म्हणती तुझे आतुर मन । बापू किती असे रे ।।८४।। आता येथे क्षणभरी । उभा न राही जा सत्वरी । हे ऐकता बापूचा अंतरी । आनंद सर्व निमाला ।।८५।। असो तेव्हापासून बापूसी । येऊ



---

१ गव्हाचे पीठ – कणीक

न दिले दर्शनासी । त्यांनीही केले प्रयत्नासी । परी सर्व निरर्थक ।।८६।। कथा पुढील अध्यायीची । रसाळ असे बहुत साची । एकाग्र चित्ते परिसंताची । आनंद तुम्हा होईल ।।८७।। स्वस्ति श्री सखाराममलीलामृत । कर्ता करविता गिरिजाकांत । रधुपतीसी करुनी निमित्त । दशमोध्याय संपविला ।।८८।। श्रीसखारामचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।।

## दशमोध्याय समाप्त

## अध्याय ११ वा



व्यंकटेशपंत एका पत्नीसह दर्शनास गेले सखाराम महाराजांच्या आशीर्वादाने
एक वर्षात उभयता पत्नींना मुले झाली



श्रीगणेशाय नमः । हे भक्तकामकल्पद्रुमा । तव नाम हरी मम श्रमा । म्हणून विनवी सौख्यधामा । शंकरा तुझा दास हा ।।१।। मागील अध्यायी झाले कथन । पुंजाजीस चमत्कार दावून । वाल्हूचे दारिद्रय निवटून । चकित केले राघोजीस ।।२।। असो शेलु नामे ग्रामाभीतरी । विप्र एक सदाचारी । करित तेथे सुभेदारी । सात्विक असे श्रोते हो ।।३।। नाम ज्याचे व्यंकटेशपंत धनवंत आणि नीतिमंत । श्रीविष्णूचा पूर्ण भक्त । सद्विवेकी भाविक ।।४।। भार्येसी न होय सुत । म्हणूनी कष्टी असे सतत । चित्त न लागे संसारात । सदा मनी झुरतसे ।।५।। संतती न होय म्हणून । केले त्याने दुसरे लग्न । दुसऱ्या कांतेसही जाण । संतती न जाहली ।।६।। पुत्रावीण गृह स्मशान । आहे ऐसे शास्त्रप्रमाण । पुत्र नसेल तेथे अन्न । साधूसंत न घेती ।।७।। दुःखी सदा व्यंकटेशपंत । निशिदिनी पुत्रचिंता करित । धन्यधान्य आहे बहुत । परी पुत्र नाही म्हणतसे ।।८।। महाराजांची कीर्ती ऐकून । दुसरी स्त्री सवे घेऊन । व्यंकटेश निघाला तेथून । जाता झाला लोणीसी ।।९।। महाराजाश्रमी येऊन । करुनी समर्थाते नमन । म्हणे करद्वय जोडून । पुत्रेच्छेने तृप्त करा ।।१०।। आपण केवळ कल्पतरु । संसार -सागराचे तारु । सकळ संतामाजी मेरु । माझी इच्छा पूर्ण करा ।।११।। तुम्हा दया सर्वाभूती । तुमची अगाध किर्ती । तरी माझ्या इच्छेप्रती । पूर्ण करा दयाळा ।।१२।। तुम्ही भक्तांचे रक्षक । दीनांचे पाहता कौतुक । परिसा माझी विनंती एक । पुत्र द्यावा मजप्रती ।।१३।। ऐसी परिसुनी त्याची वाणी । महाराज

द्रवले अंत:करणी । त्याची भक्ती पाहण्यालागुनी । काय उपाय योजिला ।।१४।। हा आहे थोर गृहस्थ । सभ्य आणि धनवंत । तरी याते नीच कृत्य । कोणतेही सांगावे ।।१५।। ऐसा मनी विचार करुन । महाराज वदती त्याचे वचन । उदके मृत्तिका भिजवून । कर्दम करी नि:शंक ।।१६।। ऐशी वदता समर्थवाणी । व्यंकटेशपंत तत्क्षणी । नि:शंक करी कर्दमालागुनी । सद्‌गुरुचे सन्मुख ।।१७।। महाराजांनी अवलोकून । घेतले त्याते बोलावून । म्हणती तुझी भक्ती देखून । माझे चित्त संतोषले ।।१८।। आता एक ऐक वचन । ठेवी सदा सद्वर्तन । दोन्ही कांता समान मानून । प्रेमा ठेवी सारिखा ।।१९।। एक संवत्सर होता निश्चित । होतील तुला दोन सुत । जाई आतां सदनाप्रत । व्यंकटेशा आनंदे ।।२०।। ऐसे महाराजांचे भाषण । व्यंकटेशपंताने ऐकून । करुनी सद्भावे वंदन । जाता झाला स्वग्रामा ।।२१।। लोटताचि वर्ष एक । उभयता पत्नीस देख । दोन पुत्र झाले चोख महाराजांच्या प्रसादे ।।२२।। असो वाशीम नामे ग्रामांत । गणपती पेशकार असत । तयाची कन्या पतिसमवेत । लोणीग्रामा निघाली ।।२३।। महाराजाश्रमी येऊन । केले तयांप्रती नमन । तया दांपत्या अवलोकून । वदती काय समर्थ ।।२४।। की तुम्ही काही दिवस । येथे करावा रहिवास । हे परिसुनिया तयास । मोद चित्ती वाटला ।।२५।। यांसी होता कित्येक दिन । महाराज करिता पाचारण । तया दांपत्यासी जाण । म्हणती जावे स्वसदनी ।।२६।। विभूतीचे लाडू करुनी । म्हणती न्या हे पदरी बांधोनी । हें एकता त्यांचे मनी । संकोच बहु वाटला ।।२७।। परी समर्थांचा धाक बहुत । आढेवेढे न घेता किंचित । निमुटपणें प्रसादाप्रत । घेतले असे तयानी ।।२८।। मग सद्‌गुरुपद

---

१ चिखल

वंदून। निघते झाले तेथून। चिती होती कष्टी पूर्ण। म्हणती न बरवा प्रसाद ।।२९ ।। आपुले कैसे हे प्राक्तन। अत्यंत पातकी म्हणून। प्रसाद दिधला रक्षेलागून। स्वस्थ न चित्ता वाटते ।।३०।। बहूत दिनापासून। इच्छित होते आमुचे मन। की श्रीसखारामदर्शन। घ्यावे कल्याणाकारणे ।।३१।। महाराजांनी कित्येक दिन। जैसे आश्रमी घेतले ठेवून। तैशापरी प्रसादा देऊन। आम्हासी तृप्त न केले ।।३२।। घडला असे कवण अपराध। म्हणून दिधला हा प्रसाद। की निष्ठा ठेवुनिया पद। नाही तयांचे वंदिले ।।३३।। ऐशापरी कष्टी अत्यंत। होऊनी चालले मार्गक्रमित। प्रसादाचा त्याग त्वरीत। करावा म्हणून काढिती ।।३४।। त्यासी करिता अवलोकन। तव दळाचे लाडू संपूर्ण। दिसताक्षणी त्यांचे मन। आश्चर्यचकित जाहले ।।३५।। हर्षभरे डुलती दोघे जण। प्रसादाते करिती ग्रहण। म्हणती आमची करुणा जाण। आली सखारामासी ।।३६।। ऐशापरी महाराजांसी। धन्यत्व देऊनी स्वग्रामासी। गेले दांपत्य ते मानसी। मुदित अती होऊनी ।।३७।। असो एक अजापाळ[1] जातीचा। सात्विक गृहस्थ असे साचा। तो लोणीसी संतदर्शनाचा। लाभ घेण्या पातला ।।३८।। मठामाजी त्वरे येऊन। केले संतपदी वंदन। म्हणे महाराजा कृपावलोकन। दासावरी करा या ।।३९।। समर्थ म्हणती तयाप्रत। मजसवे चाल त्वरित। ऐसे वदोनि ते संत। तेथूनिया निघाले ।।४०।। त्यांचे मागे तोही गृहस्थ। चालला निष्ठेने निश्चित। ग्रामाबाहेर येता समर्थ। मृत श्वाना देखती ।।४१।। म्हणती तूं ह्या श्वानासी। नेई वेगे स्वसदनासी। ऐसे

---

१ धनगर

ऐकता खेद मानसी । वाटतसे तयाच्या ।।४२ ।। समर्थास वदे कर जोडून । उत्तम प्रसाद मिळेल
म्हणून । मी तुम्हा आलो शरण । दीनदयाळा गुरुवर्या ।।४३।। घे म्हणता मृतश्वान । यासी काय
करु नेऊन । जेणे होय दारिद्रय-हरण । ऐसा प्रसाद मज द्यावा ।।४४।। ऐशापरी ऐकत भाषण ।
समर्थ वदती कृध्द होऊन । आतांचि उचली श्वान । गृही ठेवी नेऊनी ।।४५।। ऐशापरी आग्रह
देखून । निमूटपणे उचली श्वान । कांबळ्यामाजी बध्द करुन । घेऊन चाले स्वसदनी ।।४६।। मार्ग
क्रमिता विचार करी । कोपी किती मुर्ख तरी । मृत श्वान घेऊन पाठीवरी । कशास जातो गृहासी
।।४७।। ऐशापरी अवलोकुनी । गदगदा हसतील सुत, पत्नी । माझा उपहास अति करुनी ।
वेडापिसा म्हणतील ।।४८।। ग्रामांतील सर्व जण । पिशाच्च मजला म्हणून । कुचेष्टा करतील
दारुण । कैसे आता करावे ।।४९।। अमान्य करावे संतवचन । तरी हे अयोग्य म्हणते मन । मान्य
करिता । लोकापवाद कठीण । ऐशापरी विवेक करी ।।५०।। तर्क-कुतर्क बहु काढून । शेवटी
त्यागिले असे श्वान । भार तयाचा न साहे म्हणून । स्वगृही तो पातला ।।५१।। कांता म्हणे कांबळा
देखूनी । सुवर्णकेश झळके कोठूनी । काही दिसताती माझ्या नयनी । म्हणूनी पुसे पतीसी ।।५२।।
तोही जव अवलोकित । तव सुवर्णकेश झळकती बहुत । दुःख पावला अति मनात । म्हणे मी
त्यागिले व्यर्थ श्वान ।।५३।। संतवचनी विश्वासून । जरी आणितो गृही श्वान । तरी होते तितुके सुवर्ण
। अभागी असे अती मी ।।५४।। असो ज्याचे सदा शंकित मन । दृढनिश्चय नसे किमपी जाण ।
त्यासी सत्कीर्ती यश संपूर्ण । कदा काळी न मिळे पैं ।।५५।। असो ऐसे अलौकिक चमत्कार

जाण। केले यथामती वर्णन। पुढती महाराजांचे निर्याण। श्रवण करा श्रोते हो ॥५६॥
श्रीसखाराम सद्गुरुनाथ। वृध्द जाहले अत्यंत। उठता बसता न ये किंचित। परि न सोडीले
गोरजस्नान ॥५७॥ तया ग्रामानिकट जाण। दक्षिणेस देवीचे ठिकाण। स्वायुष्य अल्प उरले
म्हणून। महाराज गेले तये ठायी ॥५८॥ ग्रामांतील गौतमीचा। पथ तेथून असे साचा। अंती
लाभ गोरजस्नानाचा। व्हावा म्हणूनी राहिले ॥५९॥ महाराज थकले हे जाणून। आला
सितारामाचा नंदन[2]। कोनरी आबा ज्याचे नामाभिधान। लोणीग्रामा शीघ्र तो ॥६०॥
महाराजाचा नातू एक। नाम ज्याचे विनायक। तयांनी केला अतिरेक। श्रीसखारामसेवेचा
अ ॥६१॥ स्वामी लोणार ग्रामीचे। सच्चिदानंद नाम जयांचे। महासमर्थ अधिकारी साचे। संन्यासदिक्षा ६८
११ असे जया ॥६२॥ सखारामाची कळता मात। लोणीग्रामा आले त्वरीत। संन्यासदीक्षा समर्थाप्रत
। द्यावया आले त्वरेने ॥६३॥ अंतकाळ समय देखूनी। संन्यासदीक्षा तया स्वामींनी। दिधली
सखारामालागुनी। जाणा सुज्ञ श्रोते हो ॥६४॥ महाराजांनी नारायण। उच्चार करुनिया पूर्ण।
विसर्जिला स्वदेह जाण। तया लोणीग्रामात ॥६५॥ हरिहर ब्रम्हांइंद्रादिक। विवेक करिती सकळिक
। की आज सोडिला मृत्यूलोक। महायती सखारामे ॥६६॥ ऐसा करुनी विचार। सुरगण निघाले
सत्वर। येऊनी सखारामचरणावर। शिरे ठेविली तयांनी ॥६७॥ म्हणती सखाराम श्रेष्ठ संता। सत्य
नरदेहाची सार्थकता। करुनी दाविली जगी तत्वता। धन्य धन्य यतिवरा ॥६८॥ ऐशापरी बहुत।

---

१ गाईचा। २ मुलगा

अ ११

गौरविला तो संत। म्हणती चला सद्गुरुनाथ। स्वर्गी सुख भोगाया ।।६९।। ऐसे निर्जरांचे भाषण। सखारामें परिसुन। म्हणे मज भक्तजनां सोडून। स्वर्गसुख नावडे ।।७०।। जोवरी पुण्यभंडार। स्वर्गसुख मिळे तोवर। ऐसे मजला क्षणभंगुर। नावडे सुख कदापि ।।७१।। संत-महंतांचे दर्शन। येथे मजला घडेल जाण। दास करितील तुमचे कीर्तन। तेथे नाचेन मी आनंदे ।।७२।। ऐसे भाषण परिसून। वंदिती सखारामचरण। म्हणती आम्ही येथे येऊन। दर्शन घेऊ प्रतिदिनी ।।७३।। ऐसे वदूनी त्वरित। सुरगण गेले स्वस्थानाप्रत। सर्व तीर्थे आली ओळंगत। महाराज चरणी लोळाया ।।७४।। गंगा भागीरथी आदी करुन। यमुना सरस्वती, कावेरी जाण। म्हणती दुष्ट पातकी जन। करिती स्नान आमुच्या जली ।।७५ ।। त्या दोषांचे व्हावया नाशन। वंदिती सद्गुरुंचे चरण। मग करिती स्वस्थळी गगन। संत-महिमा वर्णित ।।७६।। असो ते सखाराम सज्जन। त्यागिते झाले स्थुल देहालागुन। जैसा शेष टाकी स्वकात जाण। दिव्य शरीरा घेऊनी ।।७७।। अथवा वसंत ऋतुमाजी जाण। वृक्ष जुनी पर्णे त्यागून। धारण करितो नूतन। तैसेच केले सखारामाने ।।७८।। असो दिव्य घेऊनी शरीर। तेथेच टाकिले कलेवर। श्रीसखाराम योगीवर। भक्तहृदयी राहिले ।।७९।। शालीवाहन शके अठराशेत। बहुधान्यनाम संवत्सरांत। कार्तिकमासी कृष्णपक्षांत। निजावतार संपविला ।।८०।। तिथी होती चर्तुदशी[1]। मंदवासरी निश्चयेसी। सुर्योदयाच्या समयासी। देह ठेविला लोणीत ।।८१।। श्रीजगंदबेच्या ठिकाणी। देह ठेविला तो घेऊनि। हरिनामगजर भक्तांनी। करुनी मिरवित आणिला ।।८२।। सोमेश्वराच्या लिंगापाशी। दिधली समाधी।



१ दि. २३ नोव्हेंबर १८७८

स्वामीसी । तेथे समाधी द्यावयासी । सुरगण आले गुप्त रुपे ।।८३।। किती भाग्य लोणीग्रामाचे । आणिक तेथील भक्तजनांचे । की श्रीसखारामसंताचे । वास्तव्य झाले तये ठायी ।।८४।। पुढील अध्यायीची कथा । भक्तिभावे श्रवण करिता । शांती मिळेल तुमच्या चित्ता । अघटित चमत्कार देखूनी ।।८५।। स्वस्ति श्रीसखारामलीलामृत । कर्ता करविता गिरजाकांत । रघुपतीसी करुनी निमित्त । एकादशाध्याय संपविला ।।८६।। श्रसखारामचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।।

## ।। एकादशोध्याय समाप्त ।।

## अध्याय १२ वा



दादाबुवांचे रुप धरुन सखाराम महाराज मजुरांना पैसे वाटतात.



श्रीगणेशाय नमः।। जय जय श्रीउमारमणा ।। भक्ताधीना त्रिपुरमर्दना । मदनांतका दयाधना। करुणा करी दासावरी ।।१।। मागील अध्यायी कथन केले । की सखाराम समाधिस्थ झाले । पुढती कोण्यापरी वर्तले । ऐका श्रोते सज्जन ।।२।। कृत्य आरंभिले देवालयाचे । कोनरी आबांनी साचे । एक संवत्सर होता तयांचे। वास्तव्य झाले स्वर्गासी ।।३।। देवालय संपविले पुढती ।लक्ष्मण याने निश्चिती। हे चुलतनातू असती। श्रीसखारामसद्गुरुचे ।।४।। लिंग स्थापनेते करुनी । कैलासवासी झाले क्षणी । पुढे मोरुतात्या उत्सुक होऊनी । सद्गुरुकृत्या चालवी ।।५।। हे समर्थांचे पुतणे चुलत। संन्यास घेऊनि समाधिस्थ। झाले अठराशे सोळात । आषाढमासी शुक्लपक्षी ।।६।। एकादशी तिथीसी । दिधली समाधी स्वामीसी । महाराजांचे अग्रभागासी । अच्युतानंद हे श्रोते हो ।।७।। पांडूरंग दादा पुढती । झाले जाणा मठाधिपती। तयांनी बाह्य कोटाप्रती। आरंभ केला असे हो ।।८ ।। ते काम अद्यापी न संपले। तये ठायी थोर चालले। असो ते दादा समाप्त झाले। महाराजांचे चुलत नातू ।।९।। शके अठराशे छत्तिसासी। आषाढमासी शुक्लपक्षी। संन्यास घेऊनी एकादशीसी। देह पांडूरंगे ठेविला ।।१०।। कोटाबाहेर आग्नेय कोनासी। दिधले असे समाधीसी । तूर्त अधिकारी मठासी। कोण विस्तारे निवेदितो ।।११।। श्री सखारामबंधूचा । सुत कोनरी आबा साचा । तया कृष्णा

नामक कन्येचा । लाभ झाला असे हो ।।१२।। जयंतीसी होता नंदन । दाजी ज्याचे नामाभिधान
। तया पुत्र झाले दोन । मनोहर आणि नाना ।।१३।। श्रीसखाराममहाराजांचे चुलत पुतणे रामकृष्ण
मोरु साचे । पुत्र दोन रामकृष्णाचे । असती लक्ष्मण, पांडुरंग ।।१४।। लक्ष्मणसी पुत्र चार । त्यातील
थोर जो श्रेष्ठ कुमर । गणपती नामे असे थोर । पत्नी ज्याची सारजा ।।१५।। ही महाराजांचे
मठात । सद्यःकाली वास करित । आल्या अतिथीस सन्मानीत । सारजाबाई श्रोते हो ।।१६।।
तया लक्ष्मणा कन्या तीन । वेणू, कमळजा, मैना जाण । मैनेसी केले अर्पण । मनोहरपंता सुज्ञ
हो ।।१७।। जैसी मिरा, मुक्ता आई । तैसीच ही मैनाबाई । करिती वस्ती हिचे हृदयी । दया क्षमा
आणि शांती ।।१८।। क्रोध नसे किंचीत । सदा पाकगृही तिष्ठत । केवळ अन्नपूर्णा भासत ।
अ संप्रत सर्वा संस्थानी ।।१९।। जेष्ठ जी वेणू तिसी । दिधले रामकृष्णासी । पाठक जो रिसोडवासी । ७२
१२ मठाध्यक्ष हाचि अशे ।।२०।। पांडुरंग दादासी कुमर । होता यादव गुणगंभीर । तयाची पत्नी शांत
चतुर । लक्ष्मी नामे मठी असे ।।२१।। तियेसी एक कन्यारत्न । रामकृष्णासी पुत्र तीन ।
सखाराम,पुरुषोत्तम जाण । प्रल्हाद अर्पिला महाराजा ।।२२।। हा अधिकारी संस्थानाचा । श्रोतेहो
आहे साचा । व्रतबंध झाला असे याचा । शके अठराशे सदतिसात ।।२३।। मासोत्तम मासासी ।
माघ कृष्णपक्षासी । इंदुवारी व्दितीयेसी । केले यासी ब्रम्हचारी ।।२४।। असो ते धन्य लोणी क्षेत्र
। काशीराम झाले पवित्र । पुराण किर्तन अन्नसत्र । चालतसे सर्वदा ।।२५।। परीस लागता लोहाते ।
जैसे उत्तम सुवर्ण होते । तैशी शोभा त्या लोणीते । महाराजांच्या योगाने ।।२६।। कार्तिक कृष्ण

चतुर्दशीपासून । यात्रा भरत तीन दिन । यात्रेकरु नवसा घेऊन । लक्षावधी येताती ।।२७।। नित्यशः संतर्पण । होतसे ज्या ठायी जाण । दक्षिणा मिळवून ब्राह्मण । तृप्त होती आनंदे ।।२८।। महाराजांच्या दर्शनासी । शिव विरिंची हृषिकेशी । येते असती प्रतिदिवशी । आणिक गंगा भागिरथी ।।२९।। अष्ट सिध्दी करिती नमन । श्रीसखारामचरणी जाण । तिष्ठताती रात्रंदिन । महिमा तेथीचा न वर्णवे ।।३०।। गंगा करीते निष्पाप । शशी हरी सर्व ताप । कल्पद्रुम देत अमूप । जे जे मनी इच्छिले ।।३१।। ही तिन्ही होती प्राप्त । तया मानवासी त्वरित । जो वंदितो भक्तियुक्त । श्रीसखारामचरणांसी ।।३२।। ज्यासी असे भूतबाधा । ज्यासी असे संमंधी बाधा । ज्यासी असे कर्तुकबाधा । जया भ्रम कांही असे वा ।।३३।। ही निघताती त्वरित । सामर्थांचे सिंचिता तीर्थ । पाकावरीही सिंचिता निश्चित । अन्न अमूप होतसे ।।३४।। ऐसे तिर्थोदकांचे महिमान । ज्यासी घडे सखारामदर्शन । तयाचे होऊनि दुःखहरण । मन आंनदित होतसे ।।३५।। नवस करिता महाराजांसी । तत्काळ पावे तो सिध्दिसी । ये विषयी शंका मानसी । आणू नये श्रोते हो ।।३६।। महायात्रेसी भक्तजन । किती येती नवसा घेऊन । गणना न करवे कवणा जाण । पुण्यप्रतापे समार्थांच्या ।।३७।। आठा दिवसा सोमवारी । भक्त जमती महाव्दारी । नवस अर्पिती सत्वरी । प्रेमभावे करोनी ।।३८।। बहुत जनां अनुभव येत । चमत्कार होती अगणित । त्यातील वेचे संक्षिप्त । यथामती वर्णितो ।।३९।। बाळ[1] खेड्यामाजी एक । पाटील कोंडाजी नामक । नवस

१ लोणी जवळ एक खेडे आहे.

फेडावा म्हणून देख। लोणीग्रामी पातला ।।४०।। महादेवभट्ट तेथील जोशी। जाऊनिया तयापाशी। म्हणे मी महाराजांसी। नवस एक केलासे ।।४१।। पांच ब्राम्हणांसी भोजनासी। मिष्ठान्न देईन निश्चयेसी। शिधासामुग्री मजपाशी। सर्व सिध्द असे पैं ।।४२।। उत्तम पाक करुन। तृप्त करा तुम्ही ब्राम्हण। ऐसे तयाचे भाषण। ऐकूनी जोशी वदतसे ।।४३।। महायात्रेमाजी ब्राम्हण। कोंडाजी न होती जाण। त्रयदिन होता संपूर्ण। ब्राम्हण घालू तुझे पैं ।।४४।। मार्गशिर्षमासी शुक्लपक्षी। कोंडाजी म्हणे व्दितीयेसी। तया महादेवभट्टासी। सिध्दता वेगे करावी ।।४५।। असो तया जोशीबुवांनी। पंचविशती व्दिजांचे झणी। पुरेल ऐसा पाक करुनी। पाचरिले व्दिजा भोजना ।।४६।। जेव्हा बैसली पंगत। इतुक्यामाजी त्रयशत। विप्र येऊनिया तेथ। भोजनालागी बैसले ।।४७।। महादेवे अवलोकून ७४

अ १२ । समर्थांचे तीर्थ घेऊन। पाकावरी केले सिंचन। बैसविले द्विजा भोजना ।।४८।। कळता ऐसे कोंडाजिसी। गेला तो समर्थापाशी। विनवितसे निःसीमभावेसी । धरुन प्रेमे पाटील ।।४९।। हे सखाराम कृपावंता। माझी लज्जा राखणे आता। पाक कैसा पुरेल समर्था। इतुक्या व्दिजांलागी पै ।।५०।। अन्नसामुग्री मजपाशी। अणुमात्र नसे निश्चयेसी। होईल आता गती कैसी। क्षुधित उठतील ब्राम्हण ।।५१।। होतील कां हे सर्व कृध्द। कैसा मिळेल आशीर्वाद। पुण्याऐवजी पाप अगाध। घडेल मज दयाळा ।।५२ ।। ऐशापरी तो दुःखित। होऊनिया विनवित। श्रीसखाराम सद्‌गुरुप्रत। निःसिमभावे करुनी ।।५३।। मठाधिपतीसहित। चिंतातूर झाले समस्त। कोणी म्हणती सद्‌गुरु समर्थ। न्यून

न पडू देईल ।।५४।। अन्नपूर्णा वसे येथे । उणे नसे तुम्हाप्रत । कोणी म्हणती सर्व हे व्यर्थ । वदता असत्य भाषण ।।५५।। ऐशापरी विप्रजन । वदती एकेमकांलागून । इतक्यामाजी बरकत पूर्ण । आली असे अन्नाते ।।५६।। व्दिज होऊनी तृप्त । उरले असे बहुत । हें देखूनिया विस्मित । विप्र चित्ती जाहले ।।५७।। म्हणती श्रीसखारामसंतांची । अगाध लीला असे साची । ईश्वराहुनी महती जयाची । थोर असे जगी या ।।५८।। असो तेथे देवळाचे । काम चालले असता साचे । कृत्य घडले विस्मयाचे । ऐका सावध होऊनी ।।५९।। वीस-पंचवीस मजूर । होते तेथे कामावर । तयांचा नाईक साचार । रंगनाथ नामे असे हो ।।६०।। आठा दिवसा तयांनी । बाजार करण्यालागूनी । द्रव्य घ्यावे हिशेब करुनी । ऐसा क्रम चालला ।।६१।। यापरी लोटता काही दिन । एक्या बाजारी मजूर मिळून । दादा संनिध आले जाण । मागावयाते मजूरी ।।६२।। दादा भाषण करिती त्यांते । की तुम्हां मजुरी द्यावयाते । कपर्दिका नसे तरी तुम्हाते । देईन पुढल्या बाजारी ।।६३।। ऐसे ऐकता दादांचे वचन । मजूर करिती त्या भाषण । की आम्ही घेतल्याविण धन । सहसा न येऊ कामाते ।।६४।। आमुचा सर्व चरितार्थ । यांच्याचवरी आहे निश्चित । तरी तुम्ही सायंकाळपर्यंत । द्यावी आम्हा मजुरी ।।६५।। ऐसे बोलता मजूर तदा । चिंतातुर झाले दादा । म्हणती साहुकार एखादा । देखुनी द्यावे धन यांचे ।।६६।। ऐसा करुनी विचार । दादा निघाले सत्वर । तव एक चमत्कार । घडला असे श्रोते हो ।।६७।। श्रीसखाराम दयाघन । दादांचे स्वरुप धरुन । मजूरांते पाचारुन । द्रव्य दिधले सर्वांचे ।।६८।। साहूकाराचे

येथून । दादा आले घेऊनी धन । मजूरांते बोलावून द्रव्य देऊ लागले ।।६९।। तव ते वदती दादाते । द्रव्ये पावले आम्हाते । बैसूनिया पारावर ते । दिधले तुम्ही तेव्हांची ।।७०।। त्याचे भाषण परिसूनी । आश्चर्य करिती दादा मनी । म्हणती ही असे सत्य करणी । श्रीसखारामाची ।।७१।। त्याच दिवशी स्वप्नात । आले श्रीसखारामसंत । म्हणती तुझ्या शिरी हस्त । माझा आहे बालका ।।७२।। मी असता साह्यकारी । काय चिंता तुज संसारी । ऐसे बोलूनी झडकरी । गुप्त झाले महाराज ।।७३।। दादा होऊनी जागृत । म्हणती धन्य सद्‌गुरुनाथ । स्वब्रीद राखण्या जो निश्चित । किती कष्ट भोगितो ।।७४।। असो पुढील अध्यायीचे कथन । समग्र ग्रंथाचे सार पूर्ण । प्रेमयुक्त ते करी श्रवण । श्रोते तुम्ही सुज्ञ हो ।।७५।। जैसा जपमालिकेमाजी एक । मुख्य मणी तो दिसे चोख । किंवा शिरी जैसा देख । अमोलिक मुगुट शोभतो ।।७६।। अथवा इंदू नक्षत्रात । कैलासी शोभे गिरिजाकांत । पुढील अध्याय तो तव्दत् । जाणा तुम्ही सुज्ञ हो ।।७७।। स्वस्ति श्रीसखारामलीलामृत । कर्ता करविता गिरिजाकांत । रगुपतीसी करुनी निमित्त । व्दादशाध्याय संपविला ।।७८।। ।। श्रीसखारामचरणार्पणमस्तु ।। शुभं भवतु ।।

## ।। व्दादशोध्याय समाप्त ।।

# अध्याय १३ वा





।।श्री गणेशाय नमः।। हे भूतगणाच्या नायका । त्रिनेत्रा मोददायका । निज भक्ताचे अघमोचका । करुणा करी दासावरी ।।१।। दिव्य शोभे गंगा शिरी । शशी झळके भाळावरी । त्रिशुळ डमरु शंख करी । रुद्राक्षमाळा गळा शोभे ।।२।। वृषभवाहन फणीभूषण । देहा विभूतिचर्चन । कंठ शोभे नीळवर्ण । कर्णी कुंडले तळपती ।।३।। शिरी बिल्व दळांचा भार । कटी व्याघ्रचर्मांबर । गिरिजा बैसे वामांकावर । गजानन सन्मुख खेळतसे ।।४।। ऐसे तुझे स्वरुप वर्णिता । वेदही शिणले तत्वता । मग या पामराची काय कथा । आता वळतो कथेकडे ।।५।। व्दादशाध्यायापर्यंत । श्रीसखाराममलीलामृत । मम मुखे वदविले समस्त । पतितपावना शंकरा ।।६।। मुख्य कळस हा या ग्रंथात रसभरित वदवोनी अत्यंत । सिध्दीस न्यावा कृपावंत । भोलानाथ विश्वंभरा ।।७।। मागील अध्यायी केले कथन । कोंडाजीची इच्छा झाली पूर्ण । सखाराम दादांचे रुप धरुन । द्रव्य दिधले मजुरांचे ।।८।। पुढील कथा अलौकिक । एकाग्र चित्ते सकळीक । परिसा तुम्ही वाटेल कौतूक । चित्ताप्रती बहुतचि ।।९ ।। नारायणराव म्हणून । मोहरीर जिंतुरचा जाण । शिवव्देषी असे पूर्ण । वीरवैष्णव जातीचा ।।१०।। समीप आली मृत्यूवेळा । हिमत्व आले कर चरणांला । ऐशा देखुनी समयाला । कांता अपार शोक करी ।।१२।। म्हणे हे सौभाग्यभांडार । लुटतो माझे काळ चोर । लेकुरवाळा हा संसार । कोण रक्षील मज आता ।।१३।। ऐसा करुनी अति शोक । केले लोणीकडे मुख । काय वदती झाली देख । गहीवरुनी सुन्दरी ।।१४।। हे सखारामा श्रेष्ठ संता ।

दीनदयाळा योगीनाथा । करुणा करी कृपावंता । लीन झाले आता मी ॥१५॥ मज द्यावे
सौभाग्यदान । वल्लभा उठवा याच्यातून । तुजलागी मी प्रेमेकरुन । करवीन अभिषेक पतिहस्ते
॥१६॥ ऐसा करिता तिने नवस । उतार पडला रोगास । हे विलोकुनी रमणीस । मोद अति
जाहला ॥१७॥ लोटताचि काही दिन । जाहला तो पूर्वीसमान । नारायण मोहरीर जाण ।
महाराजांच्या कृपेने ॥१८॥ मग कांता बोले तयास । चला जाऊ लोणी ग्रामास । तुम्हा लागी
गुण येण्यास । केला नवस महाराजा ॥१९ ॥ की मी लोणीस येऊन । पतिकरे अभिषेक करवीन
। हे ऐकताचि वैष्णव जाण । चित्ती बहू संकोचे ॥२०॥ म्हणे तेथे आहे लिंगस्थापना । वीरवैष्णव
आहोत आपण । शिवपूजा नसे धार्जिण । अभिषेक कैसा करावा ॥२१॥ ऐसे वदता त्याच
 दिनी । ज्वर आला तत्क्षणी । पूर्वस्थिती झाली झणी । काही वेळ न लागता ॥२२॥ कांता रडे 
 धाय धाय । व्दयकरे बडवी हृदय । म्हणे हे सखाराम माय । धाव आता वेगे तूं ॥२३॥ मी आहे
तुझे बाळ । तूं असती दीनदयाळ । कृपा करुनी माझे भाळ । कुंकमाने शोभवी ॥२४॥ तूं
करुणेचा सागर । भक्तांचा घेसी कैवार । अन्याय घडला जरी थोर । क्षमा करी मजवरी ॥२५॥
आता पाहू नको अंत । उठवी माझा प्राणनाथ । करी आपुले ब्रीद सत्य । सखारामा झडकरी
॥२६॥ नवस फेडला नाही म्हणून । बैसला का तूं रुसून । आता मात्र आलिया गुण । अभिषेकीन
लवकरे ॥२७॥ ऐसी ती गहीवरुन । आळवित सखारामसज्जन । उतार पडला रोगा जाण । अघटित
लीला साधूची ॥२८॥ यासी लोटता चार दिन । पूर्ववत तो मोहरीर जाण । होताचि सुंदरीचे
मन । संतोषित जाहले ॥२९॥ प्रचिती आली म्हणून चित्त । नारायणाचे झाले चकित ।

कांतेस म्हणे सद्गुरुनाथ । सत्य सत्य तुझा गे ।।३०।।आमुच्या वैष्णव मतासी । धिक्कार असो निश्चयेसी । वृथा व्देष शंकरासी । करितो आम्ही वैष्णव ।।३१।। भेद नसे हरिहरांत । आता कळले मज निश्चित । कांतेस म्हणे लोणीप्रत । जाऊ नवस फेडाया ।।३२।। मग त्वरीत सिध्दता करुन उभयता लोणीस येऊन । सखारामाते अभिषेकून । ब्राम्हण भोजन दिधले ।।३३।। असो एक चमत्कृती । अघटित घडली असे अति । यथामती तुम्हाप्रती । निवेदितो श्रोते हो ।।३४।। शेलू ग्रामामाजी एक । विप्र असे परशुराम नामक । उपनाव जयाचे खिस्ते देख । धनलोभी अती असे पैं ।।३५।। श्रीसखाराम महासंत । नवसासी पावतो त्वरीत । ऐशी कीर्ती ऐकूनी मनात । उत्सुक झाला जावया ।।३६।। घेऊनिया रुपये तीन । आला लोणीप्रत कृपण । तव तेथे उत्सव जाण । होता सखारामाचा ।।३७।। लक्षावधी यात्रा भरली जाण । दुकानांची गर्दी झाली पूर्ण । भक्तजन येता चोहोकडून । श्रीसखारामदर्शना ।।३८।। जैसे दिसे पंढरपूर । तैसे दिसे लोणीक्षेत्र । यात्रा भरली असे फार । धनिक उचले जाहले ।।३९।। ऐसी यात्रा अवलोकीत । प्रवेशता झाला तो मठात । तव सखारामनामाचा होत । गजर तेथे अतिशय ।।४०।। टाळ मृदंग वाजती । भक्त प्रेमानंदे नाचती । दिड्यांची तेथे नसे गणती । विप्र करिती रुद्रघोष ।।४१।। बिल्वदलांते घेऊन । अपार उधळिती पुष्पा जाण । तेथील आनंदोत्सवाचा कोण । महिमा वर्णू शकेल ।।४२।। असो तो वरिल गृहस्थ । प्राप्त होताचि तेथ । पदरिचे सुटूनी त्वरित । रुपये हरवले तयाचे ।।४३।। रुपये हरवले जाणून । बहु घाबरला तो कृपण । नयनी अश्रू आणून पूर्ण । धाय धाय रडतसे ।।४४।। म्हणे लाभ होईल म्हणुन । आलो मी लोणीसी जाण । तव लाभ न होता हान । उलटी झाली माझी की ।।४५।। कैचा हा सखारामसंत । थोतांड आहे

हे सर्व व्यर्थ। जरी सत्य असेल निश्चित। तरी रुपये मिळतील ।।४६।। ऐसी धरुनी भावना। आला
देवालया दर्शना। दर्शन घेताचि पुजले जाणा। त्याते श्रीफल दिधले ।।४७।। ग्रहण करुनी प्रसादाते
। गेला तो निजग्रामाते। येताची स्वसदनाते। नारळ त्याने फोडिला ।।४८।। तव त्यामाजी त्रयमासे
। सुवर्ण निघाले खासे। विलोकुनीया अद्‌भुत ऐसे। परशराम चकित जाहला ।।४९।। म्हणे मी
मिथ्या दूषण। ठेविले सखारामा जाण। धन्य साधू हा पूर्ण। जगदोद्धारक अवतरला ।।५०।। असो
ऐसे साक्षात्कार। अद्यापि येती भक्ता फार। जो तया शरण जातो नर। त्याची कामना पूर्ण होते
।।५१।। श्रोते हो हा समग्र ग्रंथ। हेचि देवालय रचिले निश्चित। व्दादश अध्याय जे समस्य।
अ आधारस्तंभ तयाचे ।।५२।। त्रयोदशाध्याय शेवटीचा। हा सुवर्णकळस त्यावरी साचा। नंददीप ८०
१३ ज्ञान ज्योतीचा। तये ठायी पाजळे ।।५३।। तेथील सायुज्यदेवीचे दर्शन। घ्या हो तुम्ही श्रोतेजन।
आनंदबोध बैराग्य पूर्ण। प्रसाद तुम्हा मिळेल ।।५४।। अथवा ही त्रयोदश मुखांनी। गंगा मिळे
अर्णवालागुनी। महापर्वकाळ मानव योनी। आला असे महद्‌भाग्ये ।।५५।। येथे आचरा म्हणून। सुज्ञ
हो तुम्ही स्नान दान। पुन्हा पर्वणीची आशा न। चित्ती बाळगा श्रोते हो ।।५६।। असो सविस्तर यांचे
सुचरित। माहित नसे मज निश्चित। महादेवाच्या कृपेकरुन। बोबडे बोल बोललो ।।५८।। सखाराम
साधुलीला। प्रसिध्द व्हावी या जगताला। धरुनी ऐशा हेतूला। बोबडे बोल बोललो ।।५९।। अहो भाविक
श्रोतेजन। तुम्हा प्रार्थितो कर जोडून। ग्रंथात जे कां दोष - गुण। त्यांची क्षमा असावी ।।६०।। असो

प्रथमाध्यायी मंगलाचरण । गणेश सरस्वतीचे स्तवन । करुनी निवेदिले जनन । श्रीसखारामरायाचे ।।६१।। व्दितीय तृतीय अध्यायी जाण । केले बालक्रीडेचे वर्णन । व्रतबंधनाचा सोहळा पूर्ण । झाला असे सखयाचा ।।६२।। चतुर्थ्याध्यायी ज्ञान । सखाराम करी गुरुमुखे श्रवण । पंचमाध्यायी कथिले लग्न । तया बाळकृष्ण सुताचे ।।६३।। षष्ठाध्यायीचे निरुपण । अहिल्येसी झाले जान्हवीचे दर्शन । सखाराम तपश्चर्या करुन येते । झाले तळणीसी ।।६४।। सप्तमाध्यायीचे ठिकाणी । मुक्ति पावली सखाराम जननी । सरस्वतीसी दर्शन देऊनी । महाराज आले लोणीसी ।।६५।। अप्पादेवा झाला चमत्कार । रायजीचा केला उध्दार । भोलानाथ आचरे तप घोर । आठव्यात ऐसे कथियेले ।।६६।। नवव्यामाजी ईशदर्शन । भोलानाथासी देऊन । फिटिजर समर्थाते देखून । आश्चर्यचकित जाहला ।।६७।। दहाव्यात केले निवेदन । चमत्कार पुंजाजीसी दावून । दारिद्रय वाल्हूचे निवटून । चकित केले राघूबापू ।।६८।। कथन केले अकराव्यात । व्यंकटेशा दिधले व्दयसुत । चमत्कार देऊनि बहूतांप्रत । समाधिस्थ झाले सखाराम ।।६९।। कोण कोण झाले मठाधिपती । समर्थ सेवा घडली किती । संस्थानाची सांप्रत स्थिती । ऐसी आहे निवेदिली ।।७०।। कोंडाजीची झाली इच्छा पूर्ण । सखारामे दादाचे रुप धरुन । सर्व मजुरांते पाचारुन । द्रव्य दिधले व्दादशाध्यायी ।।७१।। नारायणराव कालग्रस्त । तत्काळची केला मुक्त । चमत्कार दाविला परशरामाप्रत । तेराव्यात ऐसे कथियेले ।।७२।। हे त्रयोदशाध्याय त्रयोदश रत्न । ह्याची प्रेमे मालिका करुन । अहो भाविक श्रोते सुज्ञ जन । कंठी तुमच्या घातिली ।।७३ ।। की हे त्रयोदशाध्याय त्रयोदश पकान्न । प्रेमळ भाविका केले अर्पण । परी कुतर्कमक्षिका भक्षण । जेणे केली न पचे त्या ।।७४।। असो भक्तियुक्त मनेकरुन । श्रीसखारामुर्ती

पुजन । मग या ग्रथांचे पारायण । शुचिर्भूत होऊनी आंरभावे ।।७५।। जी इच्छा असले मनी । ती पूर्ण
होय तत्क्षणी । दरिद्री रोगी निपुत्रीक कोणी । वांच्छा तयाची पूर्ण होय ।।७६।। नित्य करीता याचा
पाठ । कवणही न ये संकट । ज्याचा विश्वास ह्यावरी सुभट[1] । तो सुखी राहे सर्वदा ।।७७।। असो
तुळजापूरवासिनी । जी का माझी कुलस्वामीनी । तिच्या चरणी नमन करुनी । ग्रंथ हा मी संपवितो
।।७८।। इष्टदैवत महेश्वर । आणि सखाराम गुरुवर । अप्पादेवादी संत थोर । नमूनी ग्रंथ संपवितो
।।७९।। मम पितामही[2] भागीरथीसमान । 'गीता' जिचे नामाभिधान । तिचे चरणी नमन करुन ।
ग्रंथ हा मी संपवितो ।।८०।। 'रामकृष्ण' नामे माझा पिता । 'लक्ष्मी' नामे माझी माता । नमन
अ करुनिया उभयता । ग्रंथ हा मी संपवितो ।।८१।। जिल्हा जो प्रभावती नामक । तेथील रहिवासी 
१३ ह्याचा लेखक । उपनाम ज्याचे मंडलीक । जाणा सुज्ञ श्रोते हो ।।८२।। श्रीसखाराम महाराजांनी ।
मजला स्फूर्ती दिली म्हणूनी । आणि वडिलांचे आशीर्वादेकरुनी । ग्रंथ हा संपला शिवकृपे ।।८३।।
शालीवाहन शके अडतीसात । अनलनाम संवत्सरात । चैत्रमासी शुक्लपक्षात । ग्रंथ हा संपला
नवमीसी ।।८४।। अकोला नामे जिल्ह्यात । लोणीग्राम जे प्रख्यात । जेथे सखाराम समाधिस्थ ।
ग्रंथ हा तेथे संपला ।।८५।। स्वस्ति श्रीसखारामलीलामृत । कर्ता करविता गरिजाकांत । रघुपतीसी
करुनी निमित्त । त्रयोदशाध्याय संपविला ।।८६।। श्रीसखारामचरणार्पण ।। शुभ भवतु ।।
त्रयोदशोध्याय समाप्त ।। इति श्रीसखाराम लीलामृत समाप्तम् ।।

---

१ पुर्ण पक्का । २ आजी । ३ परभणी

# ।।आरती श्री सखाराम महाराजांची ।।

जय जय सद्‌गुरुनाथा, सखारामा योगेश्वरा हो । नवनित ग्रामी वसती करुनी, पावसी भाविक नरा हो ।।
मानव जो दर्शना, येई त्याच्या किल्मिष हरा हो । अद्‌भुत कीर्ती जगती केली, अहल्येच्या नंदना हो ।।
जय. ।।१।।

जाउनी वाराणशी, द्वादश वर्षे तप मांडिले हो । तेथे निज जननीसी, भागीरथीते तुम्ही दाविले हो ।।
देखुनी पत्नीभावा दर्शन,वेगे तिज दिधले हो । येउन मग लोणीसी साक्षात्कारा आरंभिले हो ।।
जय जय ।।२।।

भोलानाथ द्विजाची देखुनी , निश्चयमय भावना हो । भेटविले गिरिवरी, श्रीवसुदेवाच्या नंदना हो ।।
जिंतुरग्रामी वैष्णव,त्याच्या केले मतखंडना हो । दरिद्र ते वाल्हूचे, निवटुनी पूर्ण केली वासना हो ।।
जय जय ।।३।।

कार्तिकमासी तुमच्या, पुण्यतिथीसी जन धाउनी हो । येती अनंत तेथे, भासे मज पंढरपूर मनी हो ।
रामकृष्णसुत रघु जोडुनी हस्त करी विनवणी हो । तुमचे गुण गावया, द्यावी सुमती मजलागुनी हो ।।
जय जय ।।४।।

रचयिता कै. रघुपती रामकृष्ण मंडलीक

## ।।आरती श्री सखाराम महाराजांची ।।

आरती सखाराम साधू, जयाचे पदांबुज वंदु ।।धृ।। मूळची जन्मभूमि तळणी।
वसतीस्थान असे लोणी। मुखोद्‍गत वेदाचा ध्वनी। सदा ध्यानस्थ रामनामी ।।
।। चाल ।। निर्गुण ब्रह्मपदी नटला।
सकल समदृष्टि। करवी अन्नपुष्टि। सर्वदेवतुष्टी। मुखचंद्रमा जसा इंदु ।।१।।
भाव धरोनी शरण येती। तयाची करी हेतुपूर्ती। दर्शने सर्व दोष हरती।
कलीमाजी ते जन तरती ।।
।। चाल ।। ऐसा कृपानिधि गुरु हो। ऐसा दयानिधि गुरु हो।
योगानंद। नाम आनंद। राहो स्वच्छंद। कृपेचा केवळ असे सिंधु ।।२।।
जयाचे पदालागी स्मरता। अत्यानंद होई चित्ता। शिवसंन्निध जीवनमुक्ता।
वास तुझाची भगवंता।
।। चाल ।। यात्रा भरवी महाद्वारी
भक्तजन जमवी। कामना पुरवी। वासना नुरवी। विनवी काशिनाथ - नंदु ।।३।।

रचयिता - कै. रावसाहेब देशमुख वेणीकर

## ।। श्री सखारामाष्टक ।।

श्रीचा असे वास ज्याच्या पदांसी । भवाब्धि नौका हरि आपदांसी ।
लोणीस वस्ती करिसी कृपाळा । प्रेमे सखाराम वर्णी गुणाला ।।१।।
सदा करी जो मनी चिंतनासी । गजाननाच्या हरि जो अघासी[१] ।
कृष्णापरी खेळसी बाळलीला । प्रेमे सखाराम वर्णी गुणाला ।।२।।
खाणी सुखाची अससी सुभक्त । चिता विसंबी न ऐशा विरक्ता ।
नेले अहिल्येस मुक्तीपदाला । प्रेमे सखाराम वर्णी गुणाला ।।३।।
रात्रंदिनी जो भजे सद्गुरुसी । कांही नसे न्यून ऐशा नरासी ।।
शुकापरी जाण वैराग्य ज्याला । प्रेमे सखाराम वर्णी गुणाला ।।४।।
मनी त्वरे जो करि पूर्णतेसी । प्रेमे करी जो नवसा तयासी ।।
नेई लयाते मद-मत्सराला । प्रेमे सखाराम वर्णी गुणाला ।।५।।
महान सामर्थ्य तपोबलाचे । सिद्धी वसे पूर्ण मठात ज्याचे ।।
घेता मिळे दर्शन बा सुखाला । प्रेमे सखाराम वर्णी गुणाला ।।६।।
हासंत जाणा असे कामधेनु । विघ्नांधकारा जणु पूर्ण भानू ।।
गदा[२] हरि स्मरता जयाला । प्रेमे सखाराम वर्णी गुणाला ।।७।।

राहो मुखी नाम सदा गुरुचे । जे शांत चित्ता करी पूर्ण साचे ।।
पावे सुखा ज्या घडे दर्शनाला । प्रेमे सखाराम वर्णी गुणाला ।।८।।
जन सुपठन प्रेमे अष्टका या गुरुचे । करित धरुनी भक्ति, दोष जाती जयाचे ।
हरती सकल पापें नाम घेता जयाचे । किमपि न मनि हेतू राहती त्या नराचे ।।९।।

---

१ पापासी । २ रागाला ।



## लोणी संस्थानातील मुख्य वार्षिक उत्सव

* श्री चे श्राद्ध - कार्तिक वद्य १४
* श्री ची पुण्यतिथी व महापंगत कार्तिक वद्य अमावस्या
* रथयात्रा व पालखी - मार्गशीर्ष शु ।। १
* श्री चा जन्मोत्सव - चैत्र शु ।। ९ (रामनवमी)

---

## फोटो व पोथी मिळण्याचे स्थान

श्री दिनकर देशपांडे
मॅग्नम सोसायटी N-5(दक्षिण)
सिडको, औरंगाबाद

श्री मकरंद सराफ
राजदिप नगर, N-5(दक्षिण)
सिडको, औरंगाबाद

श्री श्याम पाठक
जठारपेठ, गुप्ते मार्ग,
५ नंबर शाळेजवळ, अकोला



प्रकाशक - व्यवस्थापक, श्री सखाराम महाराज संस्थान, लोणी (स.म.)
ता. रिसोड जि. वाशिम (विदर्भ)

मुद्रक - सोनाली प्रिंटर्स, सिव्हिल लाईन, रिसोड जि. वाशिम

८८

आवृत्ती १५ वी किंमत रुपये २५

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन आहेत. ह्या ग्रंथाविषयी सर्व
पत्रव्यवहार प्रकाशका कडे करावा.